।। सबका मालिक आत्मा ।।

दीपावली

निमित्त

मंगलमय शुभेच्छा!



ध्यान म्हणजे नि:शब्द
ज्ञानाचा अभ्यास

नि:शब्द ज्ञान
म्हणजे आत्मज्ञान

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।। ॐ गुरुदेव ।।

आत्मा मालिक

नोव्हेंबर - २०२६



।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २५ वे अंक ११ वा नोव्हेंबर २०२६ ● RNI-MAHMAR/2001/4853

संस्थापक संपादक

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

संपादक

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

संपादकीय सल्लागार

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

मार्गदर्शक

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

आत्मा मालिक ध्यानपीठ

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

धर्मशाळा (निवास व्यवस्था)

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - आत्मिक समृद्धीचा सण - संत परमानंद महाराज ४

दिवाळीचा आध्यात्मिक अर्थ - डॉ. विजय बाणकर ६

ज्ञानेश्वरीतील लक्ष्मीपूजन - नामदेव सदावर्ते ११

दिवाळी : अंतर्ज्योतीचा उत्सव - बंडोपंत कुलकर्णी १६

महर्षी अगस्त्य आणि लोपामुद्रा यांचा दीपोत्सव - डॉ. सुनील शिंदे १९

दिवाळी सण आनंदाचा - बी. के. गायकवाड २१

दीपावली : आध्यात्मिक संकल्प का पर्व - नरेश यादव २४

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



आत्मिक समृद्धीचा सण

संपादकीय

दिवाळी हा भारतीयांचा सर्वात मोठा, आनंदाचा, समृद्धीचा सण! या सणाचे भौतिक महत्व जेवढे तेवढेच ते अध्यात्मिक पातळीवरही आहे. किंबहुना सर्वच भारतीय सणांना अध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. आपण सगळे दिवाळीमध्ये आनंदी असण्याचा बाह्यस्वरुपात प्रयत्न करतो. मग ह्यावेळेस आपणच आपल्याला विचारू, की मी खरंच दिवाळीची मजा लुटतोय की ही फक्त वरवरची दिवाळी आहे?

-संत परमानंद महाराज

दिवाळी हा भारतीयांचा सर्वात मोठा, आनंदाचा, समृद्धीचा सण! या सणाचे भौतिक महत्व जेवढे तेवढेच ते अध्यात्मिक पातळीवरही आहे. किंबहुना सर्वच भारतीय सणांना अध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. आपण सगळे दिवाळीमध्ये आनंदी असण्याचा बाह्यस्वरुपात प्रयत्न करतो. मग ह्यावेळेस आपणच आपल्याला विचारू, की मी खरंच दिवाळीची मजा लुटतोय की ही फक्त वरवरची दिवाळी आहे? ही दिवाळी खरोखरच साजरी करण्यासाठी, दिवाळीचे अध्यात्मिक महत्व जाणून घेणे खूप गरजेचे आहे.

दिवाळीमध्ये आपण सगळे घरी दिवा लावतो, घरातला सगळा अंधःकार निघून जावा यासाठी. दिवाळी ह्या शब्दामध्येच 'दिवा' आहे. पण ह्या दिव्यामागचे अध्यात्मिक स्वरूप काय? कुठला अंधकार जाण्यासाठी आपण हा दिवा लावतो? घरातील वीज गेली तरीसुद्धा आपण घरी मेणबत्ती लावतो, पण आपण त्याला दिवाळी तर म्हणत नाही ना? मग दिव्याचे इतके महत्व दिवाळीमध्येच का? ह्यामागे सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे हा दिवा जो आपण बाहेर लावतो ते एक प्रतीक आहे, स्वतःमधील आत्मस्मृतीचा दिवा लावण्याचे, स्वतःचे खरे स्वरूप जाणण्याचे.

आपण दररोजच 'आत्मा' हा शब्द ऐकतो, पण बरेचदा आपल्याला माहितच नसते कि आत्मा म्हणजे नक्की काय? आपल्या वेद, पुराणामध्येसुद्धा आत्मा शब्द वापरला गेला आहे, भगवद्गीतेमध्ये सुद्धा आत्म्याची लक्षणे, स्वरूप सांगितले गेले आहे. पण तरीसुद्धा नीट कल्पना नव्हती की आत्मा म्हणजे काय. गुरुदेवांनी या प्रश्नाचे उत्तर संपूर्ण जगाला दिलं आहे. उत्तर एकदम सोप्पे, मीच एक आत्मा आहे, जो शरीरापासून एकदम वेगळा. मी आत्मा राहतो शरीरामध्येच, सगळ्या गोष्टींचा अनुभव पण मीच करतो, पण त्या गोष्टी बाहेर दर्शविण्यासाठी मी आत्मा ह्या शरीराचा वापर करतो. शरीर हे फक्त एक निमित्तमात्र आहे, माझ्या भावना बाहेर दर्शविण्यासाठी. मी आत्मा अतिसूक्ष्म ज्योतीर्बिंदू स्वरूप आहे, जो ह्या शारीरिक डोळ्याने दिसत नाही, पण आपण रोजच अनुभव मात्र करतो. आत्म्याचा मूळ स्वभाव आहे शांती, प्रेम. मी आत्मा अजर, अमर, अविनाशी आहे. हे आत्म्याचे ज्योतीर्बिन्दुस्वरूप जाणून घेणे म्हणजेच आत्मस्मृतीची ज्योत लावणे.

आजपर्यंत आपण सगळे स्वतःला एक शरीर मानून चालत आलो. आणि या एका चुकीच्या समजुतीमुळे आजकाल आपण सगळे काहीना काहीतरी दुःख उपभोगत आहोत. रोजच्या भाषेमध्ये मात्र आपण वापरतो आज 'माझा' हात दुखत आहे, आज 'माझे' शरीर दुखत आहे, माझा हात, माझे शरीर, हा 'माझे' म्हणणारा कोण? तोच मी, एक शांतस्वरूप आत्मा. ह्या एका चुकीमुळे आपण रोज किती मानसिक त्रासातून जातो. जेव्हा आपण स्वतःला शरीर म्हणून चालतो तेव्हा तुलना सुरू होते, मी

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

दुसऱ्यापेक्षा जास्त सुंदर किंवा कमी. एका भावनेने अवाजवी आत्मविश्वास तर दुसऱ्या भावनेने न्यूनगंड. दोन्हींमध्ये मानसिक त्रास आहे. अजून एक भय जे सर्वांमध्ये आहे ते म्हणजे मृत्यूचे भय. शरीर जे निर्माण झाले आहे ते नष्ट तर होणारच, पण मी आत्मा अविनाशी आहे. जेव्हा आपण प्रत्यक्षात हे आत्मस्वरूप अनुभव करू लागतो तेव्हा मृत्यूचे भय..? आणि ज्याला मृत्यूचे भय नाही त्याला ह्या जगात अजून कुठलेही भय नाही.

जसा मी एक आत्मा आहे जो ह्या शरीराद्वारे स्वतःला दर्शवितो, तसेच इतर सर्व पण आत्मा आहेत. ते पण आपापल्या शरीराद्वारे स्वतःला व्यक्त करतात. मज आत्म्याचा मूळ स्वभावच आहे शांती आणि प्रेम. मी एक शांतीस्वरूप, शांतीप्रिय आत्मा आहे. जर रोजच्या जीवनामध्ये आपण पहिले तर कळून येईल, रोज कितीही आपण धावपळ केली तरी शेवटी प्रत्येक माणूस शांती शोधतो. त्यासाठी आपण कधीतरी सुट्टीवर जातो, संगीत ऐकतो वगैरे वगैरे. पण पुन्हा ह्या सगळ्या गोष्टी शांती बाह्यस्वरुपात शोधण्यासाठी आपण करतो. पण जेव्हा मला हे जाणवते की मी स्वतःच शांतस्वरूप आहे, तर परिस्थिती कुठलीही असू दे मी माझी शांती ढळू देणार नाही. त्याचप्रमाणे, प्रेम हे प्रत्येक आत्म्याला हवे असते. आपण नात्यांमध्ये पण त्याच कारणांसाठी येतो. नाती बनतातच प्रेमाची देवाण-घेवाण करायला. पण तरीसुद्धा आजकाल दिसून येईल की कुठे न कुठेतरी नात्यांमध्ये दुःख अनुभवायला येते. जर खरंच प्रेम हे माझे स्वरूप आहे, तर मग मी कुणाला कधीही दुखवू शकतो? जर ह्या स्वतःच्या मूळ स्वरुपाची आणि स्वभावाची जाणीव झाली आणि ती रोजच्या जीवनामध्ये आणली तर आपले सगळे संबंध किती सुखावह होतील. हे आत्मस्वरूप जाणून घेणे आणि शांती आणि प्रेमाचा स्वभाव कधीही ढळू न देणे, कुठल्याही परिस्थितीमध्ये, हेच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरे करण्यासारखे आहे.

आपण दिवाळीमध्ये जो दिवा लावतो तो मातीचा असतो. त्यामध्ये आपण वात लावून, थोडे तेल टाकून मग दिवा लावतो. ह्या मातीच्या दिव्यामागे, वातीमागे आणि तेलामागेसुद्धा अध्यात्मिक कारण आहे. मातीचा दिवा (पणती) हे प्रतीक आहे ह्या शरीराचे. आपले शरीर बनले आहे मातीपासून (पाच तत्वांपासून). वात ही जशी पणतीमध्ये असते पण तरीही पणतीपासून वेगळी. त्याचप्रमाणे मी आत्मा ह्या शरीरामध्येच असतो पण तरीही शरीरापासून वेगळा. पण त्या वातीवर दिवा लावायलासुद्धा तेल हे लागतेच. आणि हे तेल आहे ज्ञानाचे प्रतीक. मी कोण?, परमात्मा कोण? हे सृष्टीचक्र म्हणजे तरी काय? ह्याचे ज्ञान मिळविणे हेच प्रतीक आहे ह्या तेलामागे. जेव्हा तेल नसते तेव्हा ज्योत लागू शकत नाही आणि प्रकाश पडू शकत नाही. आज बहुतांशी लोकांना हे ज्ञानरूपी तेल न मिळाल्याने बहुतांशी व्यवहार अंधाकारातच होतात आणि म्हणूनच आजकाल आपण आपल्या संबंधामध्ये दुःख उपभोगतो. जेव्हा मला हे आत्मास्मृतीचे ज्ञान होईल आणि ते मी रोजच्या व्यवहारामध्ये दर्शवीन तेव्हाच माझे जीवन मी अधिक सुखकर करू शकेन.

तर ह्या दिवाळीला आपण सगळे जण खऱ्या अर्थाने, आत्मस्वरूपी दिवा लावून दिवाळी साजरी करूयात. एकमेकांना शांती आणि प्रेम देवून, एकमेकांना आत्मस्वरुपात पाहून, एका नवीन वर्षाची वाटचाल सुरू करूयात. मग आयुष्यातील मिठास एकदम वाढेल, दिवाळीतल्या मिठाईसारखी. दिवाळीत सद्गुरूंचे ध्यान करीत आत्म्याला परमानंदाची अनुभूती देऊया.

|| आत्मा मालिक ||

- संत परमानंद महाराज,

संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



दिवाळीचा आध्यात्मिक अर्थ

मनुष्याच्या मनावर, इंद्रियांवर आणि शरीरावर सतत संस्कार करून त्यांना मुक्तिदायी स्वधर्माचरण करण्यास सक्षम करणे व ठेवणे हा संस्कार करण्यामागील मुख्य उद्देश होय. तो सफल होत रहावा म्हणून ऋषीमुनींनी व ज्ञानी महात्म्यांनी नित्य कर्मे, चालीरीति, रूढी, परंपरा, धार्मिक विधी, सण, उत्सव वगैरे सुरू करून दिले आहेत. त्यांच्या मनातील तो उद्देश समजून घेण्यासाठी उदा. दिवाळी या सणाचा रूढ व आध्यात्मिक अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करूयात.

- डॉ. विजय बाणकर

पूर्वी आश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंतच्या काही तिथींना आनंदकारक घटना घडून गेल्या. त्या घटनांचे श्रेयस्कर म्हणजे आत्मज्ञान वृद्धीस सहाय्यकारी अर्थ मनी बाळगून त्याप्रमाणे वागणे म्हणजे संस्कृतीचा पाईक बनण्याचा प्रयत्न करणे होय.

१) वसुबारस :

अ) रूढ अर्थ - धनत्रयोदशीच्या आदल्या दिवशी गोवत्स द्वादशी असते. यास वसुबारस असेही म्हणतात. या दिवशी सुवासिनी स्त्रिया सवत्स गायीची श्रद्धापूर्वक पूजा करतात. हा दिवसही दिवाळीचाच एक दिवस मानला जातो.

ब) आध्यात्मिक अर्थ - अध्यात्मशास्त्रज्ञ संतांनी जी सवत्स गाय पूज्य असल्याचे सांगितले आहे ती त्रिपदा म्हणजे तीन पायांची आहे. संत श्रीतुकाराम यांनी तिचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे -

आम्हां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ।।१।।

वान ते सावळी नाव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवने ।।२।।

संपूर्ण त्रैलोक्यरूपी वासरास जन्म दिलेल्या म्हणजे ३३ कोटी देव, अष्ट कोटी भैरव इत्यादीयुक्त अनंत ब्रह्मांडे जिच्या पोटात सामावलेली आहेत त्या ॐकारस्वरूप देवाधिदेवरूपी गायीचे पूजन केल्यानेच सनकादिक समाधान पावले. म्हणूनच त्यांच्यासारखे साधुसंत 'सदा सण सांत नित्य दिवाळी' असल्याचे अनुभवत असतात. **'ॐकार गाय ती । जेथोनी सकळांची उत्पत्ती ।।'** होत असल्याचे जगद्गुरू श्रीहंबीरबाबा यांनीही म्हटले आहे. संत श्रीएकनाथांनीदेखील 'गाय'नामक रूपक अभंगात विविध अवतार घेणारी ही देवरूपी गाय नरसिंहरूप धारण करून प्रल्हादाघरीं होती, पंढरीच्या पुंडलिकाकडे होती आणि जी जनीं विजनीं म्हणजे सर्वत्र आहे तीच आपल्याही घरीं दुभत असल्याचेही म्हटले आहे.

अध्यात्मज्ञानी संतांनी उल्लेखिलेल्या व फक्त दिव्य ज्ञानदृष्टीला दिसणाऱ्या त्या त्रिपदा गायीचे (म्हणजे विश्वाचे बीज असलेल्या व अ, उ, म हे तीन पाय असलेल्या ॐकाररूपी गायीचे) बाह्य प्रतीक म्हणून लोक आपल्या चर्मदृष्टीला दिसू शकणाऱ्या चतुष्पाद गायीची गोमाता म्हणून पूजा करीत असतात. चतुष्पाद गाय ही इतर प्राण्यांपेक्षा अधिक उपयुक्त असा एक प्राणी आहे. म्हणूनच कृषीप्रधान जीवनात गोमातेचे कृतज्ञतापूर्वक पालनपोषण करणे आवश्यक होय. थोडक्यात, अनुक्रमे ऐहिक व पारमार्थिक

जीवनास उपयुक्त असलेल्या या दोन्ही प्रकारच्या गायींचे स्वरूप समजून घेऊन वसुबारस साजरी करणे म्हणजे आपल्या अध्यात्मज्ञानप्रधान संस्कृतीतील संस्कार जतन करीत वागणे होय.

२) धनत्रयोदशी :

अ) रूढ अर्थ - आश्विन वद्य त्रयोदशीला धनत्रयोदशी हे नांव आहे. मृत्यूदेवता यमाने त्याच्या दूतांना 'या दिवशी जो दीपदान करील त्याला अपमृत्यू येणार नाही' असे सांगितल्याची कथा आहे. म्हणून धनत्रयोदशीला मंगलस्नान करून दीप लावले जातात. यमासाठी दक्षिणेकडे तोंड करून याच दिवशी दिवा लावला जातो.

ब) आध्यात्मिक अर्थ - यथासांग योगसाधना करणारा जीव, आपण सारे जीव ज्योतिरूप आहोत, असे अनुभवतो. संत श्रीज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणे 'ज्योतींची निजज्योती' असलेला तो परमात्मारूपी विठ्ठल ज्या अनंत ज्योतिरूपांनी नटला आहे त्या ज्योती म्हणजे आपण सारे 'जीव' होय, असे त्यास सदोदित होते. अर्थात, गीतेत म्हटल्याप्रमाणे आपण सारे जीव देवांचेच अंश आहोत. या आपल्या मूळ देवस्वरूपाचे ज्ञान होण्यापूर्वी जीव वारंवार जन्मत व मरत राहतो. जन्ममरणरूपी फेऱ्यात अडकून राहणे ही आत्मज्ञानरूपी खऱ्या प्रगतीच्या तुलनेत जीवाची झालेली अधोगती असते. ही अधोगती म्हणजेच 'अपमृत्यू' होय. याउलट दीपदान करणे म्हणजे 'यमराजा'चे (काळाचाही काळ असलेल्या देवाधिदेवाचे) आत्मज्ञानयुक्त वा अमर्त्यभावाने स्मरण करणे होय. आत्मानुभवसंपन्न जीव भगवान श्रीकृष्णाने गीतेच्या आठव्या अध्यायात (श्लोक क्र. १३ ते २१मधून) सांगितलेली ऊर्ध्वगती पावतो, देह सोडून जाताना त्याला दु:ख होत नाही, तो संत श्रीतुकाराम म्हणतात त्याप्रमाणे आपला मृत्यूदेखील 'अनुपम्य सुखसोहळा' असल्याचे अनुभवतो. थोडक्यात, आपण अमर आत्मा आहोत, या सानुभव ज्ञानाची प्राप्ती हीच खरी अक्षय्य धनाची प्राप्ती होय आणि अशा प्रकारे ते अविनाशी धन प्राप्त करून घेणे ही खरी म्हणजे आध्यात्मिक धनत्रयोदशी साजरी करणे होय.

३) नरकचतुर्दशी :

अ) रूढ अर्थ - आश्विन वद्य चतुर्दशीस नरक चतुर्दशी म्हणतात. या दिवशी श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला व त्याच्या बंदिवासातून सोळा हजार स्त्रियांना बंधमुक्त केले. नरकासुराच्या रक्ताचा टिळा लावून श्रीकृष्ण सूर्योदयापूर्वीच परत आला. त्यावेळी त्याला मंगलस्नान घालून ओवाळण्यात आले. या घटनेची आठवण म्हणून सूर्योदयापूर्वी स्नान करून लोक दिवे लावतात व आनंदोत्सव साजरा करतात.

ब) आध्यात्मिक अर्थ - सुर म्हणजे देव व देव नाही तो असुर होय. जीव आत्मज्ञानाअभावी असुर असतो. संत श्रीतुकाराम म्हणतात, 'जीव अवघे देव । व्यर्थ नागवी संदेह ।।' जीवरूपी असुराने स्वरूपविषयक अज्ञानामुळे स्वत:ला त्रिविध दु:खरूपी नरकात म्हणजे अनेक दोषयुक्त असलेल्या शरीरात वावरणाऱ्या काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर या अवगुणांच्या नरकात अडकून घेतलेले असते. अशाप्रकारे असुर बनलेला जीव गुरुकृपायुक्त सोऽहंसाधनेने स्वरूपाला जाणतो म्हणजे आपण आत्मारूपी कृष्ण म्हणजे देवच असल्याचे अनुभवतो. अर्थात,जीव नरकातून मुक्त होतो व सर्व दु:खदायी विकारांचा समूळ नाश होतो. जो देह कफ, वात, पित्त या दोषांनी संत्रस्त असतो, जो गीता-ज्ञानेश्वरीत वर्णिलेल्या आसुरी संपत्तीचे म्हणजे दुर्गुणांचे जणू भांडार झालेला असतो तोत्याचा 'देहच देवाचे मंदिर' बनतो, त्याचा 'अवघाचि संसार' सुखाचा म्हणजे संपूर्ण देह सच्चिदानंद होतो, स्वत:च्या देहात प्रकाशलेल्या आत्मज्योतीच्या ज्ञानाने विश्वात सगळीकडे सर्वत्र आत्मज्योतिरूप खरे म्हणजे कधीही न विझून जाणारे

दीप दिसू लागतात. संत श्रीज्ञानेश्वरांच्या भाषेत, 'डोळ्याला ते परतत्त्व दिसू' लागते. थोडक्यात, आत्म्याविषयीची अज्ञानजन्य अविवेकाची काजळी काढून टाकल्यामुळे आत्मज्ञानरूपी विवेकदीप उजळतो तेव्हा निरंतर दिवाळी असल्याचा अनुभव येत राहणे (पहा, ज्ञानेश्वरी, ४.५४) हाच खरा खऱ्या संत योग्यांना अनुभवास येणारा नित्य दीपोत्सव होय.

४) लक्ष्मीपूजन :

अ) रूढ अर्थ - आश्विन वद्य अमावास्याचे रात्री लक्ष्मीपूजन असते. या निमित्ताने अष्टदलकमलावर लक्ष्मीची स्थापना करून तिची पूजा करतात. लक्ष्मी हे सौंदर्याचे, प्रेमाचे व वैभवाचे प्रतीक आहे. संयमपूर्वक सन्मार्गाने धन संपादन केले तर मनुष्याचे कल्याण होते. यासाठी यादिवशीहीधनलक्ष्मीची पूजा करायची असते. केवळ या रात्रीच द्यूत खेळावे, असे सांगितले आहे. द्रव्य हे चंचल आहे, हे लक्षात आणून देण्यासाठीच या खेळाची योजना केली असावी. लक्ष्मी या दिवशी सर्वत्र संचार करीत असते. जेथे स्वच्छता, मांगल्य, प्रकाश आढळेल तेथे ती निवास करते, अशी समजूत असल्यामुळे या रात्री दिव्यांची रोषणाई करतात. घरातील कचरा, घाण म्हणजे अलक्ष्मी दूर करणाऱ्या केरसुनीलाही लक्ष्मी मानून तिची काही ठिकाणी पूजा केली जाते.

ब) आध्यात्मिक अर्थ - अष्टदलकमल म्हणजे अष्टधा प्रकृती होय. पुरुष व प्रकृती हे सृष्टीचे घटक होत. जीवाला पराप्रकृती असेही म्हणतात व तोच वा तीच खरी म्हणजे अविनाशी लक्ष्मी होय. पृथ्वी, आप, तेज, वायू व गगन ही पंचमहाभूते तसेच सत्त्व, रज व तम हे तीन गुण या आठ प्रमुख तत्त्वांपासून शरीर म्हणजे प्रकृती तयार होते. रूढ अर्थाने ज्या लक्ष्मीला चंचल म्हटले आहे ती म्हणजे नाशिवंत शरीर व त्यासाठी लागणारे धनादी होय. मृत्यूरूपी जुगारामुळे जीव क्षणात अशरीरी म्हणजे लक्ष्मीहीन होतो. 'नाही देहाचा भरवंसा । कोण दिवस येईल कैसा ।।' असे जणू तदर्थक व सूचक विधान श्रीरामदासांनी केले आहे. स्वच्छता, मांगल्य, प्रकाश हे शब्द आत्मज्ञानसूचक आहेत. जिथे आत्मज्ञान नाही तिथे सर्व अस्वच्छ, अमंगल व अंधारमय असते. तोपर्यंत शरीर घाण म्हणजे अपवित्र वा ओवळे असते. 'कान्होबा तुझी घोंगडी चांगली ।' असे श्रीकृष्णाच्या सच्चिदानंदी शरीराला उद्देशून बोलणाऱ्या संत श्रीज्ञानदेवांनीदेखील आत्मज्ञान नसताना जाणवलेल्या आपल्या सर्वांची शरीरे वांगली म्हणजे सदोष असल्याचे उल्लेखिले आहे.

श्रीकृष्णाचे शरीर स्वगत, सच्चिदानंदी, शुद्ध सत्त्वगुणी, षड्गुणैश्वर्यसंपन्न आहे तर आपले शरीर रक्त, रेत, दुर्गंधी, जंतू, नरक, मूत्र इत्यादिंनी भरलेले आहे. या शरिराला षड्विकार व त्रिविध ताप लागलेले असतात. म्हणून योगसाधना करून श्रीकृष्णासारखी दिव्य काया होणे म्हणजेच खऱ्या लक्ष्मीची प्राप्ती होणे होय. त्यासाठी शरिराविषयी असलेली आसक्तीरूपी घाण आत्मज्ञानप्राप्तीविषयक निश्चयाने दूर करावी लागते. घर स्वच्छ करावयास उपयुक्त असणाऱ्या केरसुनीच्या पूजेने आत्मज्ञानाची उपासना करावी, असे ज्ञानी महात्म्यांनी सूचित करून ठेवले आहे.

५) बलिप्रतिपदा :

अ) रूढ अर्थ - हा दिवाळीचा मुख्य दिवस मानतात. कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिप्रदा म्हटले जाते. या दिवशी विष्णूने वामनावतार घेऊन बळीराजाला पाताळात लोटले. या दिवशी दीपदान करील त्याला यमयातना भोगाव्या लागणार नाही, असा वामनाने बळीला वर दिला. या दिवशी बलिपूजा करण्याचीही

पद्धत आहे. या दिवसापासून विक्रम संवत्सर सुरू होतो. म्हणून याला दिवाळी पाडवा म्हणतात. साडेतीन मुहुर्तांपैकी हा अर्धा मुहूर्त आहे. या दिवशी पत्नीने पतीला ओवाळण्याची पद्धत आहे. काही ठिकाणी गोवर्धनपूजा करण्याचीही प्रथा आहे.

ब) आध्यात्मिक अर्थ - बळीराजा हा अनंत विश्वातील एक जीव होय. महान पुण्य संपादून तो श्रेष्ठ ठरणार होता. तेव्हा श्रीविष्णूने वामन म्हणजे लहान व्यक्तीचे रूप धारण करून बळीराजाकडे तीन पावलांची जागा मागितली. तिसरे पाऊल टाकण्यास जागा उरली नाही म्हणून बळीने स्वत:ला वामनाच्या पायातळी दिले. श्रीविष्णूचरणीं समर्पित झालेल्या बळीराजाचे स्मरण म्हणून बलिप्रतिपदा हा दिवस मानण्यात येतो. आपण सर्वजण बळीप्रमाणे जीवरूप आहोत. आत्मज्ञानापूर्वी जीवाला देवाच्या पायातळीं द्यावे लागते. **'तुका म्हणे बळी । जीव दिला पायातळी ।।'** 'शरीर म्हणजे मी'हा भ्रम नष्ट करताना जीवाला अनेक कष्टसहन करावे लागतात. देहोऽहंभाव लय पावल्यानंतर आत्मज्ञान होते. आत्मज्ञानाने सामर्थ्यसंपन्न झालेला बळीचा हा विश्वविक्रम होय. बळीची पूजा करणे म्हणजे म्हणजे आत्मज्ञानयुक्त सामर्थ्याची उपासना करणे होय. आत्मज्ञान नसताना जगलेले आयुष्य हे लटक्या वा मिथ्या वा क्षणिक सुखदु:खाचे असते. हे दु:खकायमचे नाहीसे होऊन आत्मज्योत प्रज्वलित होऊन जीवन प्रकाशित म्हणजे अखंड सुखमय होणे म्हणजे खऱ्या बळीचे राज्य येणे होय.

श्रीतुकाराम म्हणतात,

'भक्ती ते कठीण शूळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।'

हेच श्रीकबीर 'लाखोमें देख और कोटीमें एक' या शब्दांनी सूचवितात. 'तीर तोफ घेऊनी लढे तो शूर नव्हे हो खरा । त्यजूनी माया करी भक्ती तो शोभे शूर खरा ।।', असेही त्यांनी एका दोह्यात म्हटले आहे. अर्थात, गीतेत म्हटल्याप्रमाणे हजारात एखादा आत्मदेवप्राप्तीसाठी प्रयत्न करतो व अशा हजारातीलही क्वचित एखादा मायेचा नियंता असलेल्या त्या परमेश्वराला तत्त्वत: जाणतो.

जीव हा दहा प्राणांच्या सहाय्याने शरीरव्यापार करीर असतो. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात शरिराला शेत व जीवाला शेतकरी म्हटले आहे. जीव आत्मज्ञानसंपन्न होत असताना तो पंच प्राणांच्या ज्योतींनी ब्रह्मांडात म्हणजे मेंदूच्या पोकळीतील सहस्रदलकमलनिवासी देवाची आरती करतो. 'पंचप्राणांची आरती' हे शब्द सर्वांना परिचित आहेत. जीव हा पत्नी व देव हा पती होय. जीवाने देवाला ओवाळणे हा दिवाळी पाडव्याचा मूलगामी अर्थ होय. जो जीव ही ओवाळणी करतो तो 'हो कां पुरुष अथवा नारी ।बहिणी म्हणे तेचि पतिव्रता खरी ।।' असतो, असे अभंग-विधान श्रीबहिणाबाईंनी केले आहे.

६) भाऊबीज :

अ) रूढ अर्थ - कार्तिक शुद्ध द्वितीयेला भाऊबीज असेही म्हणतात. या दिवशी यम आपल्या बहिणीकडे गेला तेव्हा तिने त्याला ओवाळले आणि आपला आनंद व्यक्त केला. तेव्हापासून बहिणीने भावाला ओवाळण्याची प्रथा सुरू झाली.

ब) आध्यात्मिक अर्थ - यम हा मृत्यूदेवता अर्थात काळ होय. काळ म्हणजे परमेश्वर होय. परमेश्वराचा विशेष अंश म्हणजे प्रत्येकाच्या हृदयात (सहस्रदलकमलात) असणारा शिव होय व त्याची बहिण म्हणजे परमेश्वराचाच अंश असलेला नाभिकमलात राहणारा आपला जीव होय. भावाने बहिणीच्या घरी जायचे याचा अर्थ जीवाला आत्मज्ञान झाल्यानंतर अर्थात सर्व विश्व एकाच परमेश्वरापासून निर्माण झाले आहे

असे अनुभवून पुन्हा देहाशी तादात्म्य कल्पिल्याने जीव बनलेल्या बहिणीला समाधान देणे होय.

अध्यात्मशास्त्रामध्ये व संतसाहित्यात अनेक रूपकांनी, दृष्टांतांनी एकच तत्त्व प्रतिपादित केले गेले आहे. म्हणून कधी जीवाला पत्नी व देवाला पती तर कधी देवाला भाऊ व जीवाला बहीण लेखवतही अध्यात्मशास्त्रातील अतिशय गूढ पण अनुभवगम्य असलेले सिद्धान्त सूचित केले गेले आहेत. म्हणूनच भाऊबीजेचा कौटुंबिक व सामाजिक अर्थ घेऊन नंतर आध्यात्मिक अर्थ समजून घेणे क्रमप्राप्त होय.

संत श्रीतुकारामांनी आणखी एका अभंगात दिवाळीचा आध्यात्मिक अर्थ सांगितला आहे. ते म्हणतात,

'धन्य आजि दिन । झाले संतांचे दर्शन ।।१।।
झाली पापातापां तुटी । दैन्य गेले उठाउठी ।।२।।
झाले समाधान । पायीं विसावले मन ।।३।।
तुका म्हणे आले घरां ।तोचि दिवाळी दसरा ।।४।।

संपूर्ण विश्वात भरून उरलेल्या त्या 'शेष' परमेश्वराचे ज्ञान झाले की व्यक्तीची प्रवृत्ती पूर्णतः शांत होऊन ती संत होते. अशा संत पुरुषांचे दर्शन झाल्याने मनाला प्रसन्नता लाभते. श्रीकबीर म्हणतात, 'तयां भेटतां सुख भेटते.' आपल्या मनातील किल्मिष, पापभावना, द्वैतभाव, अज्ञान, दुःख इत्यादी दूर जाऊ लागते. त्यावेळेपुरते तरी संतत्व म्हणजे काय ते जाणवत राहते. अर्थात, खरे साधुसंत घरी आल्याने वा भेटल्याने जे वातावरण निर्माण होते त्यालाही श्रीतुकारामांनी दिवाळी म्हटले आहे.

अध्यात्मशास्त्रदृष्ट्या भ्रूमध्य ही पिंड व ब्रह्मांड यामधील सीमारेषा होय. जीवरूपी साधक जोपर्यत या सीमारेषेवर असलेल्या दशवेद्वारातून वर देव राहतो त्या ब्रह्मांडात जात नाही तोपर्यंत तो अपूर्ण ज्ञानी म्हणजे अज्ञानीच राहतो. ही अज्ञानसीमा उल्लंघून जाण्याची प्रवृत्ती संतदर्शनाने होते. श्रीगुरुकृपायुक्त योगसाधना करीत अज्ञानाची सीमा उल्लंघून गेल्यानंतरच श्रीतुकाराम म्हणतात त्याप्रमाणे देव पहावयासी गेलेला तो जीव देवाशी एकरूप होऊन जातो व संतत्व पावतो. म्हणूनच संतदर्शनदिनाला दसरा म्हटले आहे. दसऱ्यानंतर दिवाळी येते म्हणजे संतदर्शनानंतर संत झालेल्या व्यक्तीच नित्य दिवाळीचा आनंद उपभोगत राहते.

- डॉ. विजय बाणकर,
बी-११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,
कोल्हेवाडी, सिंहगडरोड, पुणे ४११०२४





ज्ञानेश्वरीतील लक्ष्मीपूजन

सर्वच लोक श्रीलक्ष्मीचे पूजन आदराने, भक्तिभावाने करतात. लक्ष्मीमाता आपण केलेल पूजनाने प्रसन्न व्हावी व तिने आपल्या घरी सतत राहावे, अशी आशा सर्वांना असते. त्यासाठी अनेक व्रत उपासना आहेत. जीवनोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी सर्वांना धनसंपत्ती हवी असते. म्हणून सर्वसामान्य माणूस प्रयत्नपूर्वक लक्ष्मीप्राप्तीसाठी धडपडत असतो. लक्ष्मीप्राप्तीमुळे घरात सुख-समाधान राहते. दीपावलीच्या दिवशी घरोघरी अत्यंत भक्तिभावाने लक्ष्मीपूजन केले जाते.

-नामदेव सदावर्ते

ज्ञानराजांनी ज्ञानेश्वरीत लक्ष्मीमातेचे स्मरण-पूजन केलेले आहे. भगवद्गीतेला जे जगदंबेची उपमा देतात, अर्जुनाचा मोह नष्ट करून त्याला युद्धप्रवृत्त करणारी गीता. गीता ही सप्तशती, मोह-महिषासुरमर्दिनी देवी आहे. अठरा अध्यायांची गीता ही अष्टादशभुजा देवी आहे. गीता ही जरी देवीमाता आहे, तशीच ती महालक्ष्मीमातासुद्धा आहे. गीता ही विचाररूपी क्षीरसागराचे मंथन करून त्यातून प्रकट झालेली ही नवी लक्ष्मीच आहे.

जे ज्ञानामृताची जान्हवी। जे आनंदचंद्रीची सतरावी।
विचार क्षीरार्णवींची नवी। लक्ष्मी जे हे ।।

गीता ही ज्ञानरूपी अमृताची गंगा आहे. आनंदरूपी चंद्राची ही सतरावी जीवनकला आहे. ही गीता आपल्या पठणाने, ज्ञानाने आपले जीवन समृद्ध करणारी आहे. आयुष्यभर आपल्या शरीरात ईश्वरी चैतन्य शक्तीरूपात असते. शरीरात ही प्राणशक्ती असते तोपर्यंतच जीव जिवंत असतो. देहहीन पुरुषाच्या घरी जशी लक्ष्मी थांबत नाही, तसेच चैतन्यहीन शरीरात चैतन्य वास करीत नाही.

जैसे गतायुषी शरीरी। चैतन्य वासु न करी।
कां निदैवाच घरी। न राहे लक्ष्मी ।।

जो निष्क्रिय, दुर्बळ, निर्धन असतो त्याच्या घरी लक्ष्मी राहत नाही. पण दुर्बळ, दीन भक्ताच्या संसारात निर्धनता असूनही जर तो नामस्मरण-भक्ती करीत समाधानवृत्तीने राहणारा असेल, तर तो भक्त भाग्यवान ठरतो.

पै निर्धनाघरी वानिवसे। महालक्ष्मीचि येऊनि बैसे।
तयाते निर्धन ऐसे। म्हणो ये काई ।।

ज्याच्या हृदयी सतत नामस्मरण-भक्ती असते तो श्रीमंतच असतो. धनऐश्वर्यसंपन्न लक्ष्मीच्या बरोबरीची दुसरी कोणी आहे काय? ज्या लक्ष्मीच्या घरी स्त्रीयेसारख्या दासी आहेत. त्या दासींनी भातुकलीच्या खेळात केलेल्या घरकुलांना अमरावती असे नाव दिले, तर इंद्रादिक त्या खेळातील बाहुल्याच ठरतील. खेळाचा कंटाळा आल्यावर त्या दासी जेव्हा खेळ मोडतात तेव्हा इंद्रासारखे देवही रंक होतात.

नातरी अथिलेपणे सरिसी। कवणी आहे लक्ष्मी ऐसी।
स्त्रियेसारिखिया दासी। घरी जियेते ।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

जिच्या घरच्या दासींची एवढी शक्ती आहे, त्या दासींची मुख्य मालकीण लक्ष्मी तिचीही भगवंताजवळ फारशी किंमत नाही. भगवंताच्या पुढे लक्ष्मीचे ऐश्वर्य आणि श्रीशंभूच्या तपाचेही महत्त्व नाही.

तैसे लक्ष्मीयेचे थोरपण न सरे। जेथ शंभूचे तपही न पुरे।
तेथ येर प्राकृत हेंदरे। केवि जाणो लाहे।

भगवंताची प्राप्ती होण्यासाठी लक्ष्मीसारखी श्रीमंती किंवा श्रीशंभूंसारखी तपश्चर्या यांची आवश्यकता नाही. आपला मोठेपणा दूर ठेवून, विद्वत्तेचा अभिमान न बाळगता नम्रपणे लहान होऊन जगता वावरणे असे केले, तरच त्या भगवंताची प्राप्ती होते. कारण लक्ष्मीनेही अभिमान सोडून, देवाला सर्वस्व अर्पण करून देवाची सेवा केली तेव्हा केवळ भगवंताचे चरण धुण्याचे भाग्य तिला लाभले.

मग सर्वस्वे करूनि सेवा। अभिमान सांडुनि पांडवा।
जे पाय धुवावयाचिया दैवा। पात्र जाहली ।।

जे भक्त आपले सर्वस्व भगवंताला अर्पण करून शरण जातात व त्यांची अनन्य भक्ती करतात, जो भगवंत वेदांना समजला नाही. भगवंतच स्वतःला यथार्थपणे जाणतो. आकाशाला स्वतःचा विस्तार माहीत नसतो. ज्ञानराज म्हणतात, हे लक्ष्मीपती देवा, तूच तुला जाणणारा आहेस. बाकी वेदादि जे आहेत, ते फक्त तुझा मोठेपणा वर्णन करतात. त्यांनाही तुझे सामर्थ्य पूर्णपणे समजले नाही.

तैसा आपुलिये सर्व शक्ती। तुज तूचि जाणे लक्ष्मीपती।
येर वेदादिक मती। मिरविती वाया ।।

देव म्हणतात, जे माझे अनन्य भक्त आहेत त्यांच्या आशीर्वादाने अग्नीचे व तेजाचे आयुष्य वाढले. ते भक्त या पृथ्वीतलावरील देवच आहेत. मी लक्ष्मीलाही दूर सारून गळ्यातील कौस्तुभ काढून हातात घेतला. मग त्यांच्या पायधुळीकरिता छातीचा खवळगा पुढे केला. हे केवळ भक्तिमुळे.

मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती। फेडोनि कौस्तुभ घेतला हाती।
मग वोढविली वक्षस्थळाची वाखती। चरणरजा।।

अलोलूपता हा दैवी संपत्तीतील एक दैवी गुण आहे. परकोटीची अलोलूपता कशी असते, तर सर्व महासिद्धी बरोबर घेऊन स्वतः लक्ष्मीदेवी भगवंताकडे सेवेसाठी आली असताना श्रीविष्णूने तिच्याकडे पाहिलेसुद्धा नाही. इतकी निर्मोहता फक्त भगवंताकडेच आहे.

हे असो महासिद्धीसी। लक्ष्मीही आलियां पाशी।
परी महाविष्णू जैसा। न गणिच ते ।।

ज्ञानराज म्हणतात, श्रीगुरूंच्या चरणांना नमस्कार करून मी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सांगणे सुरू करतो. तो ब्रह्मदेवाचा पिता व लक्ष्मीमातेचा पती श्रीकृष्ण म्हणतात,

ते नमस्कारूनि आता। तो पितामहाचा पिता।
लक्ष्मीयेचा भर्ता। ऐसे म्हणे ।।

ज्या स्वामीच्या योगाने चारी पुरुषार्थ सनाथ झाली, तो कृष्णराया जेथे आहे, तेथे लक्ष्मी असावयाचीच.

तैसे सकळ पुरुषार्थ। जेणे स्वामी का सनाथ।
तो श्रीकृष्णरावो जेथ। तेथ लक्ष्मी।।

ज्याच्याजवळ आपल्या पतीसह जगन्माता लक्ष्मी आहे. म्हणून ज्या पक्षाला, तो लक्ष्मीचा पती उभा आहे तेथे सर्वसिद्धी मूर्तिमंत उभ्या आहेत. म्हणून जेथे लक्ष्मी व श्रीकृष्ण व जेथे पंडुसुत अर्जुन आहे, तेथेच विजय निश्चित आहे.

म्हणोनि जिया बाही उभा। तो लक्ष्मीयेचा वल्लभा।
तेथे सर्वसिद्धी स्वयंभा। येर मी नेणें।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

कौरव-पांडवांच्या युद्धात कोणाचा विजय होईल? या धृतराष्ट्राच्या प्रश्नाला उत्तर देताना ज्ञानराज म्हणतात,

म्हणोनि जेथ श्री तेथे श्रीमंतु। जेथ तो पंडूचा सुतु।
तेथे विजय समस्तु। अभ्युदयो तेथ ।।

ज्ञानेश्वरीत भगवती, महिषासुरमर्दिनी जगदंबा, महालक्ष्मीमाता यांचे स्मरण करून ज्ञानराजांनी लक्ष्मीपूजन केले आहे.

देवी लक्ष्मी ही श्रीविष्णुपत्नी असून ती भगवान श्रीविष्णूंची शोभा व कांती मानतात. देवदैत्यांनी क्षीरसागराचे मंथन केले, त्यावेळी लक्ष्मी सागरातून वर आली. ती उत्पन्न होताच देवांचे तेज वाढले. तिचे रूप-लावण्य पाहून देव, असुर, यक्ष, किन्नर सारे जण तिच्यावर लुब्ध झाले. ही रूपवती सुंदर स्त्री आपल्याला मिळावी अशी सर्वांना इच्छा झाली. पण लक्ष्मीने सर्वांना अव्हेरून भगवान श्रीविष्णूंच्या गळ्यात वरमाला घातली. लक्ष्मी विष्णुपत्नी झाली.

दुसरी कथा अशी, लक्ष्मी स्वतः सांगते, मी सूर्यकिरणांनी पूर्ण विकसित झालेल्या कमळातून जन्माला आली आहे. सर्व भूतांच्या कल्याणासाठी मी हा अवतार धारण केला आहे. कमळांची माळा गळ्यात धारण करणारी मी पद्मालक्ष्मी आहे. हे इंद्रा, मी लक्ष्मी, श्री, श्रद्धा, मेधा, धृती, क्षमा आहे. या सद्गुणांच्या रूपात मी प्रकट होत असते.

कालचक्र स्वभावतः परिवर्तनीय असते. कालचक्रात सापडलेली प्रत्येक वस्तू अनित्य असते. सारे जग विनाशशील आहे. नश्वर वस्तूचा नाश होणारच. त्यासाठी कुणीही शोक करू नये. मी लक्ष्मीसुद्धा कुणासाठीही कायम स्थिर राहत नाही. चंचल अशा लक्ष्मीने अनेकांचा त्याग केला आहे. समर्थ रामदासस्वामी मनाचे श्लोकात लक्ष्मीचे चांचल्य वर्णन करतात-

मना सांग पा रावणा काय जालें।
अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले।
म्हणोनि कुडी वासना सांडी वेगी।
बळे लागला काळ हा पाठीलागी।।

वारा, माकड आणि वीज या तिघांचे स्वभावरसायन एकत्र केले तरी मनाच्या चंचलतेची बरोबरी करता येणार नाही. या मनाची सारी चंचलता सुखाच्या शोधासाठी असते. तसेच एका ठिकाणी स्थिर न राहता लक्ष्मी सतत फिरत असते. लक्ष्मीच्या चांचल्याचे वर्णन करताना संत रावणाचे उदाहरण देतात. चौदा-चौकड्यांचे राज्य रावणाने चौदा दिवसांत घालविले. रावणाजवळ सोन्याची घरे असलेली लंका व प्रचंड राज्य होते. मंदोदरीसारखी पतिव्रता स्त्री होती. इंद्रजितासारखा शूर आणि तत्पर मुलगा होता. कुंभकर्णासारखा सुस्वभावी, म्हणून जागेपणापेक्षा झोपून राहण्यात सुख मानणारा आणि रावणाच्या बाजूने लढणारा असा भाऊ होता. अफाट आणि आज्ञाधारक सशस्त्र सेना दिमतीला होती. वाटेल ते रूप बदलता यावे, अशी विलक्षण सिद्धी शक्ती होती. रावणाला काहीच कमी नव्हते. रावण भगवान शंकराचा मोठा भक्त होता. पण अशा रावणाजवळ देवी लक्ष्मी स्थिर राहिली काय?

महाभारतातील एके ठिकाणी इंद्रदेव राजलक्ष्मीला म्हणतात, हे देवी, असे मी काय केले असता तू मला अंतरणार नाहीस? तू माझ्याजवळ सदैव राहावे असे मला वाटते. हे देवी, मी तुझ्या आज्ञेत राहील. तुझ्या आज्ञेचे उल्लंघन करणार नाही. मी सदा कालधर्माचे अनुसरण करीन, तूच मला योग्य मार्गदर्शन करू शकतेस.

राजलक्ष्मी इंद्राला आपला स्वभाव सांगते. लक्ष्मीच्या अडचणींचा विचार करणारे लक्ष्मीला चंचल म्हणतात. सत्प्रवृत्त, संयमी, त्यागी आणि परोपकारी अशा पुरुषांच्या आश्रयाला राहणे लक्ष्मीला आवडते. परंतु ध्येयनिष्ठ, सद्गुणी, कर्तव्यकर्मरत, संशोधन तत्पर आणि परमबुद्धिमान लक्ष्मीकडे ढुंकूनही पाहत नाहीत.

स्वार्थी, लंपट, विषयलोलूप, विश्वासघातकी, अघोरी कर्मे करणारे लोक लक्ष्मीची इच्छा नसताना तिला प्राप्त करून घेतात आणि सर्व जगाच्या दुःखाची वृद्धी करतात. दुःखाच्या सहवास संगतीने लक्ष्मी दूषित होते. कालचक्रात सतत भ्रमण करणे हा लक्ष्मीचा मूळ स्वभाव आहे. लक्ष्मीचा वास कोठे असतो, कोठे नसतो, हे लक्ष्मी स्वतः इंद्रदेवाला सांगते. धर्माचरण करणाऱ ज्येष्ठ पुरुषांच्या निवासस्थानी मी सदैव राहते. सत्य व धर्म यांचे उल्लंघन न करणारे मला खूप प्रिय असतात. दान, अध्ययन, यज्ञयाग, कर्तव्यनिष्ठा यांची ज्यांना आवड असते. देव, गुरूजन, माता-पिता व वडीलधाऱ्या पुरुषांची जे लोक मनापासून सेवा करतात अशा सत्यनिष्ठ, सज्जन भक्तांच्या हृदयात माझा निवास असतो. अंतर्बाह्य स्वच्छता ज्यांना प्रिय असते व संकटसमयी जे धैर्याचा त्याग करीत नाहीत, अशा लोकांच्या ठिकाणी मी निवासाला येते. जे सतत प्रयत्नशील असतात, अशा लोकांची संगत मला फार आवडते. स्वच्छता, शूचिर्भूतपणा, सौंदर्य आणि आरोग्य या रुपांनी मी प्रकट होत असते. संयमशीलता, उद्योगप्रियता, अध्ययनप्रियता, आणि प्रयोगशीलता, तन्मयता ही माझ्या उदयाची लक्षणे आहेत. मी चंचल नाही, अथवा स्थरही नाही. चंचल मनाच्या पुरुषांच्या सहवासात मी चंचल दिसते.



दुर्गुणी माणसांच्या सहवासाने संसर्गाने लक्ष्मीला दोष लागतो. अहंकारशून्यता, सहृदयता, माशीलता, अद्रोह, शूचिता व कोमलता हे गुण म्हणजे लक्ष्मीची तेजस्वी प्रभा होय. आळस, निद्रा, अविवेक, क्रोध आणि स्वार्थ या दुर्गुणांची जेथे वस्ती असते, तेथे लक्ष्मी कधीच राहत नाही. अन्याय-अत्याचाराने साठविलेली संपत्ती कुठेही टिकत नाही. योगायोगाने ती जशी येते तशीच ती निघून जाते. उद्योगाला, सत्कर्माला व मानणाऱ्यांच्या घरी लक्ष्मी जन्म घेते.

संपत्तीची काही तत्त्वे महाभारतकारांनी सांगितलेली आहेत. काही स्वार्थी लोक लक्ष्मीच्या चलत्वाला बंध घालतात. धनसंपत्ती साठवून ठेवतात. यामुळे संपत्ती गोठविली जाते. ती एकाच ठिकाणी साचते. संपत्ती फिरती राहिली पाहिजे. साठविलेली धन संपत्ती अनर्थ निर्माण करते. लक्ष्मी संपत्ती ही भगवान विष्णूंची पत्नी आहे. ती जगन्माता आहे. तिला सर्व मुले सारखीच आहेत. तिला सर्वांकडे जाता आले पाहिजे. सर्वांच्या भेटीने तिला सुख होते. गोठवलेली संपत्ती दुःखी असते. ती असुरी बनते. ती कष्टाविना मिळालेली असते.

कर्मफळाचा सिद्धांत न समजल्यामुळे माणसे अनुचित कर्मे करतात. धनाचा लोभ करतात. धनार्जन करीत असताना अनेक पापांचा जन्म होतो. त्या धनाचा विनियोगही पापाच्या कुकर्मात होतो. धनाचा विनियोग सत्कर्मासाठी केला नही, तर धन अनर्थकारी ठरते. बुद्धिमान लोक धनाचा विनियोग सत्कार्यासाठी करतात. शुभ कर्माने लक्ष्मीची वृद्धी होते. सद्गुणांनी, दैवी गुणांनी लक्ष्मी स्थिरावते आणि संयमाने लक्ष्मी सुरक्षित राहते.

आसुरी संपत्ती अधोगतीस नेते. दैवी संपत्तीच्या प्राप्तीने माणूस सुखी-समाधानी होतो. लक्ष्मी सदा सर्वकाळ आपल्याजवळच राहावी, असे सर्वांनाच वाटते. लक्ष्मीच्या व्यापक रुपाची कल्पना असावी. श्रीविष्णूंच्या आधारासने धर्म व जगत निर्माण होते. जेथे धर्म-नारायण असेल, तेथे श्रीलक्ष्मीचा निवास

असतो. जेथे धर्मनारायण नाही, तेथे लक्ष्मी थांबत नाही. दैवी गुणसंपन्न असे कर्माचरण जेथे घउते, तेथे लक्ष्मी स्थिरावते.

त्याग, तपश्चर्या, शास्त्रांचे अनुशीलन, श्रद्धा, यज्ञ, क्षमा, भाव, शुद्धी, संयम आणि सत्य या सद्‌गुणांना आत्म्याची संपत्ती म्हणतात. ज्यांच्या अंतर्यामी श्रीभगवान नारायण राहतो, त्याला लक्ष्मी सोडून जाणे शक्य नाही. तो भगवंत नारायण हृदयी धरून ठेवावा. जेथे शिव असतो, तेथे शक्ती असते. तसेच जेथे श्रीहरी विष्णू असेल, तेथे श्रीलक्ष्मी असतेच. संत ज्ञानदेव म्ळणतात-

तैसे सकळ पुरुषार्थ। जेणेस्वामी का सनाथ।
तो श्रीकृष्णरावो जेथ। तेथ लक्ष्मी।।

सर्वच लोक श्रीलक्ष्मीचे पूजन आदराने, भक्तिभावाने करतात. लक्ष्मीमाता आपण केलेल्न पूजनाने प्रसन्न व्हावी व तिने आपल्या घरी सतत राहावे, अशी आशा सर्वांना असते. त्यासाठी अनेक व्रत उपासना आहेत. जीवनोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी सर्वांना धनसंपत्ती हवी असते. म्हणून सर्वसामान्य माणूस प्रयत्नपूर्वक लक्ष्मीप्राप्तीसाठी धडपडत असतो. लक्ष्मीप्राप्तीमुळे घरात सुख-समाधान राहते. दीपावलीच्या दिवशी घरोघरी अत्यंत भक्तिभावाने लक्ष्मीपूजन केले जाते.

महाराष्ट्रातील सर्व संतांनी धन-संपत्तीचे क्षणभंगुरत्व सांगितले आहे. श्रीहरी विष्णूंच्या कृपेशिवाय संपत्ती, सत्ता, बळ हे सर्वच निरर्थक आहेत. हे अनेक प्रकारे समजावून सांगितले आहे. श्रीहरीकृपा झाली, तर संसारासाठी आवश्यक तेवढी संपत्ती कष्टाने प्राप्त होते. म्हणून सर्व संतांनी संसारात राहून आपला व्यवसाय करून सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाह केला आहे. श्रीहरीविठ्ठलाचे नामस्मरण व चिंतन हीच संतांची उपासना होती. संतांनी लक्ष्मीची आराधना करतानाही श्रीहरिचिंतन केले आहे. केवळ लक्ष्मीपूजन न करता श्रीहरीविष्णूसह लक्ष्मी-नारायण पूजन संत करतात.

संत तुकारामांनी एका अभंगात रावणाचे व लंकेच्या श्रीमंतीचे वर्णन करून संपत्ती मृत्यूनंतर आपल्या बरोबर येत नाही, हेच सांगितले आहे. ते म्हणतात, लंकेत घरे किती होती ते सांगतो ऐका. नेमकी संरव्या सांगतो. पाच लारव घरे फक्त दगडांची आणि सात लारव घरे विटांची. शिवाय अनेक कोटी घरे धातूची, तांब्यापितळाची व सात कोटी घरे शुद्ध सुवर्णाची होती. शेवटी तुकोबा म्हणतात-

तुका म्हणे ज्याची संपदा ऐवढी। सांगाते कवडी नेली नाही।।

दिवाळीच्या आनंदाच्या दिवसांत लक्ष्मीचा पती श्रीविष्णू यांची भक्तिभावाने पूजा करून, हे महाविष्णू देवा, तू माझ्या घरी लक्ष्मीसह ये, अशी आराधना पूजन करणे आवश्यक आहे. अशी संतांची शिकवण आहे. देवी लक्ष्मीच्या ऐश्वर्याचे वर्णन करताना ज्ञानराज म्हणतात- भगवंताची अखंडपणे चरणसेवा करणारी देवी लक्ष्मी तर ऐश्वर्यवती आहेच, पण लक्ष्मीच्या अनेक दासीसुद्धा ऐश्वर्यसंपन्न आहेत. लक्ष्मीच्या दासींचे ऐश्वर्य ज्ञानदेव सांगतात.

तियां खेळतां करिती घरकुली। तया नामे अमरपुरें जरि ठेविली।
तरि न होती काय बाहुली। इंद्रादिक तयांची।।

-नामदेव सदावर्ते,
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक



सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



दिवाळी : अंतर्ज्योतीचा उत्सव

हिंदू संस्कृतीत दिवाळी हा सर्वात आनंददायी आणि मोठा सण मानला जातो. पुराणातील अनेक कथा दिवाळीशी जोडल्या गेल्या आहेत. प्रकाशाचा सण, आनंदाचा सण, घराघरांत उजाळा आणणारा सण, श्रीराम यांचं लंका विजयासह अयोध्या आगमन सण, अशी दिवाळीची ओळख आहे. पण संतांच्या दृष्टीने या सणाचा अर्थ अधिक खोल आहे. दिवाळीचा प्रकाश बाहेरच्या अंगणात पेटवलेल्या पणत्यांपुरता नाही. तो मनातील काजळी हटवणारा आहे.

-बंडोपंत कुलकर्णी

दिवाळी हा केवळ दीपांचा, रांगोळ्यांचा, पदार्थांचा आणि बाजाराचा सण नाही. तो मानवी जीवनातील अंधकार-प्रकाशाच्या संघर्षाचे प्रतीक आहे. महाराष्ट्राच्या संत साहित्यात दिवाळीचा उल्लेख जागोजागी आलेला आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, जनाबाई या संतांच्या अभंगांत आणि विचारांत दिवाळी ही एक बाह्य उत्सवाची घटना म्हणूनच नव्हे, तर अंतर्मातमनातील अज्ञानाचा अंधार दूर करून विवेकाचा दीप उजळवणारी जीवनदृष्टी म्हणून पाहिली गेली आहे. संतांनी दिवाळीच्या पाच दिवसांच्या आनंदाला मर्यादित न ठेवता, तो आनंद सर्व वर्षभर, अगदी आयुष्यभर कसा टिकून राहील, याचा मार्ग दाखवला आहे. हा मार्ग आहे विवेक, सत्संग, संतकृपा आणि सद्वर्तनाचा. दिवाळीचे लखलाटी रूप बाजारात दिसत असले तरी संत साहित्यातील दिवाळी ही अंतर्ज्योतीची, ज्ञानप्रकाशाची आणि सौजन्याची दिवाळी आहे.

हिंदू संस्कृतीत दिवाळी हा सर्वात आनंददायी आणि मोठा सण मानला जातो. पुराणातील अनेक कथा दिवाळीशी जोडल्या गेल्या आहेत. प्रकाशाचा सण, आनंदाचा सण, घराघरांत उजाळा आणणारा सण, श्रीराम यांचं लंका विजयासह अयोध्या आगमन सण, अशी दिवाळीची ओळख आहे. पण संतांच्या दृष्टीने या सणाचा अर्थ अधिक खोल आहे. दिवाळीचा प्रकाश बाहेरच्या अंगणात पेटवलेल्या पणत्यांपुरता नाही. तो मनातील काजळी हटवणारा आहे. मनावर साचलेली अविवेकाची काजळी हीच माणसाच्या दुःखाचे मूळ आहे. ती काजळी फेडून विवेकाचा दीप उजळला की मग प्रत्येक दिवस दिवाळीचा होतो. संतांची ही अपेक्षा केवळ आध्यात्मिक नाही, तर व्यावहारिकही आहे. कारण विवेकाचा प्रकाश असेल तर माणूस सद्विचारांकडे जातो, चांगले वर्तन करतो आणि आपल्या आसपासच्या जगात सौजन्य निर्माण करतो.

ज्ञानेश्वर महाराज जीवनात निरंतर दिवाळी यावी यासाठी आपण केलेला प्रयत्न सांगताना म्हणतात

मी अविवेकाची काजळी । फेडोनी विवेक दीप उजळी।।

ते योगिया पाहे दिवाळी । निरंतर।।

येथे ज्ञानेश्वरांनी दिवाळीचे अत्यंत सुंदर रूप उभे केले आहे. माणसाच्या जीवनात अविवेक हा दुःखाचा स्रोत आहे. अविवेकामुळे माणूस सत्य-असत्य, चांगले-वाईट, कर्तव्य-अकर्तव्य यातील फरक ओळखू शकत नाही. या अविवेकाची काजळी जेव्हा मनाच्या पटलावर जमा होते, तेव्हा जीवन अंधकारमय

होते. ती काजळी फेडून विवेकाचा नंदादीप पेटवला की मग अखंड दिवाळीचा आनंद मिळतो. विवेकाचा दीप उजळला की सद्विचारांची वाट दिसते आणि त्या वाटेवरून चालताना मिळणारा आनंद खंडित होत नाही. म्हणूनच संतांनी दिवाळीचा बाह्य उत्सव साजरा करताना अंतर्मनातील अंधकार दूर करण्यावर भर दिला. दीप पेटवणे म्हणजे केवळ पणती पेटवणे नाही तर आपल्या मनातील अज्ञान, अहंकार, द्वेष, लोभ, मत्सर हे अंधार दूर करून ज्ञानाचा, प्रेमाचा, करुणेचा प्रकाश पेटवणे होय. ज्ञानेश्वरांच्या पसायदानातही हाच विचार दिसतो

दुरितांचे तिमीर जावो। विश्वस्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांच्छिल तो ते लाहो। प्राणिजात।।

'दुरितांचे तिमीर' म्हणजे अज्ञानाचा अंधार. रीतीच्या विपरीत आचार करणारा म्हणजे दुरित होय. विश्वधर्माचा सूर्य उगवावा आणि प्राणिमात्रांच्या इच्छा पूर्ण व्हाव्यात, अशी प्रार्थना ज्ञानेश्वर महाराज करतात. हे पसायदान म्हणजे दिवाळीच्या प्रकाशाचे आध्यात्मिक रूप आहे. जेव्हा अज्ञानाचा अंधार जातो, तेव्हा माणूस आपल्या खऱ्या स्वरूपाचा शोध घेतो. ज्ञानाचा सूर्य उगवला की माणसातील माणुसकी जागते. संतांच्या दृष्टीने दिवाळीचा अर्थ हाच आहे की अंधारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे आणि दुःखातून आनंदाकडे जाणारा मार्ग आहे.

तुकाराम महाराज दिवाळीचा अर्थ अधिक सोप्या आणि व्यावहारिक भाषेत सांगतात. ते म्हणतात

साधू संत येती घरा। तोची दिवाळी दसरा।।

तिथीप्रमाणे वर्षातून पाच दिवस येणारी दिवाळी आनंददायी असतेच. पण तुकाराम महाराज म्हणतात, ज्या दिवशी साधुसंत आपल्या घरी येतील, तो दिवस कोणताही असो, तोच आमचा दिवाळी-दसरा. संत अगर साधूंच्या भेटीत अंतर्मनात ज्ञानाचा दीप उजळतो व त्यातून दिवाळीचा आनंद मिळतो. तसा आनंद मिळण्याचे कारण संत देतात.

संत संगतीचे काय सांगू सुख। आपणा पारिखे नाही तेथे।।

संतांच्या संगतीचे सुख शब्दात सांगता येत नाही. ते अनुभवावेच लागते. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणे ती अनुभूती 'शब्देविन संवादु, गुजेविन अनुवादु' अशी असते. संतांच्या सहवासात जड-मूढ व्यक्तीही तरुण होते, जागते होते. कारण तिथे आपली पारख देहबुद्धीतून होत नाही तर संत हे आत्मरूप या दृष्टीने आपल्या कडे पाहतात व आत्म मिलनाचे धडे देतात. म्हणून संतांची संगत देवापेक्षाही महत्त्वाची आहे, असे तुकाराम महाराज सांगतात. देव प्रसन्न झाला तर भौतिक सुख, मोक्ष, मुक्ती देईल, पण देव करणार नाही. संतांची कृपा मात्र माणसाला संतपदाला पोहोचवते.

आपणासारिखे करिती तत्काळ। नाही काळ-वेळ तयालागी।।

संतांची कृपा झाली की व्यक्ती कितीही अवगुणी असली तरी तिचा तत्काळ उद्धार होतो. संत नारदांच्या कृपेने दरोडेखोर वाल्याचे वाल्मीकी झाले. ज्ञानेश्वरांच्या कृपेने रेडा श्रेष्ठ पदाला पोहोचला. आजही पुणे जिल्ह्यातील आळे गावी त्या रेड्याची समाधी आहे आणि लाखो वारकरी चैत्र वद्य द्वादशीला त्या समाधी सोहळ्याला भक्तिभावाने माथा टेकवतात. याचा अर्थ संतकृपा ही केवळ भावनिक गोष्ट नाही. ती जीवनाला ज्ञानाच्या उजेडाने भरणारी शक्ती आहे. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात

दिवाळी-दसरा तोची आम्हा सण। सखे संतजन भेटतील।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

संतांच्या विचारांची उष्टावळी अनुभवायला मिळणे हीच खरी दिवाळी, असेही ते म्हणतात

तुका म्हणे त्यांच्या घरची उष्टावळी। मज ते दिवाळी दसरा सण।।

येथे 'उष्टावळी' हा शब्द अत्यंत सुंदर अर्थाने वापरला आहे. संत घरच्या उष्टावळी म्हणजे त्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचा अंश प्राप्त झाला तरी ते साधकांसाठी दिवाळी सणापेक्षा कमी नाही. संतांनी जे विचार जगाला दिले, त्यांचा थोडासा अनुभवही जीवनात आला तर तो दिवाळी-दसऱ्यासारखा आनंद देणारा ठरतो. म्हणजे दिवाळी ही केवळ तिथीच्या आधारे येणारी गोष्ट नाही, ती संतविचारांच्या सहवासातून येणारी जीवनदृष्टी आहे. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या साहित्यात दिवाळी ही प्रतीकात्मक उपमा म्हणून पाहायला मिळते. मात्र आद्य चरित्रकार नामदेव महाराजांच्या साहित्यात प्रत्यक्ष देवासोबत दिवाळी साजरी केल्याचे वर्णन आहे. जनाबाई देवाला दिवाळीचे निमंत्रण देताना म्हणते

आनंदाची दिवाळी। घरी बोलवा वनमाळी।। घालीते मी रांगोळी। गोविंद गोविंद।।

नामदेव भगवान पांडुरंगाच्या मंदिरात जाऊन देवाला घेऊन घरी येतात.

सण दिवाळीचा आला। नामा राऊळाशी गेला।।

हाती धरोनी देवाशी। चला आमुच्या घराशी।।

नामदेवांनी देवाला उटणे लावले, अभ्यंगस्नान घातले आणि आपल्या लुगड्याच्या पदराने देवाचे डोके पुसले.

पदर डोईचा काढीला। बाळ नंदाचा पुसीला।।

ही भक्ती केवळ दोन देहाची नाही. ती माणसाच्या आणि देवाच्या नात्यातील आत्मीयतेची आहे. दिवाळीच्या निमित्ताने देव घरी येतो, माणूस देवाचे आतिथ्य करतो. पण संतांच्या दृष्टीने खरा देव तोच, जो माणसाच्या हृदयात विवेक, प्रेम आणि करुणा म्हणून प्रकाशतो. विठोबाच्या राज्यात नित्य दिवाळीचा आनंद अनुभवायचा असेल, तर मनात विठ्ठलाची भक्ती आणि आचरणात सज्जनता हवी.

दिवाळीचा आनंद निरंतर जीवनात राहायचा असेल तर संतांच्या विचारांचा उजेड आपल्या पुढे आणि मागे दाटला पाहिजे. त्या उजेडात केलेली वाटचाल जीवनप्रवास सुखकर करते. जीवनात दुःख-दैन्य पूर्णपणे पळून जात नाही, पण त्यांचा मुकाबला करण्याचे सामर्थ्य माणसाला प्राप्त होते. दिवाळीच्या निमित्ताने केवळ घर सजवणे, पदार्थ बनवणे, कपडे खरेदी करणे एवढेच पुरेसे नाही. आपल्या मनातील अहंकार, द्वेष, मत्सर, लोभ, अविवेक यांची काजळी फेडून विवेकाचा दीप उजळवणे हीच खरी दिवाळी. संतांच्या विचारांचा दीप आपल्या जीवनात पेटवला तर प्रत्येक दिवस दिवाळीचा होईल. म्हणूनच दिवाळीच्या निमित्ताने संतांच्या विचारांशी एकरूप होण्याचा, सत्संगाचा महिमा जाणून घेण्याचा आणि सौजन्याने वागण्याचा संकल्प करू या. हाच संतांचा संदेश आणि हीच खरी दिवाळी.

- बंडोपंत दि कुलकर्णी,
सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, पुणे.



सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



महर्षी अगस्त्य आणि लोपामुद्रा यांचा दीपोत्सव

दिवाळीचा आणि दिव्यांचा संबंध पुरातन आहे. असे मानले जाते की, जेव्हा महर्षी अगस्त्य विपुल धन, सुवर्ण तसेच रत्ने घेऊन आश्रमात परतले, त्यावेळी लोपामुद्रेच्या इच्छेनुसार तत्कालीन अवघा परिसर राजवाड्यासारखा सुशोभित करण्यात आला. अगस्त्य ऋषींनी आणलेल्या ऐश्वर्याचे स्वागत करण्यासाठी आणि अभाव, कमतरता व उणीवा दूर सारून समृद्धीचा उत्सव साजरा करण्यासाठी लोपामुद्रेने संपूर्ण आश्रम शेकडो दिव्यांनी उजळवून टाकला होता. गृहस्थधर्माचा हा विजय मानला गेला.

-डॉ. सुनील शिंदे

दीपोत्सव अर्थात भारतीय आध्यात्मिक परंपरेतील प्रकाशपर्वाची ऋषी-मुनींची संकल्पना आणि भूमिका विलक्षण प्रत्ययकारी आहे. वेगवेगळ्या संदर्भात श्लोकांचा आधार घेऊन ही परंपरा आपल्याला जाणून घेता येते. महर्षी अगस्त्य मुनी आणि त्यांच्या पत्नी लोपामुद्रा यांच्या संकल्पनेतील दिवाळीचे प्रकाशपर्व उपलब्ध संदर्भसाहित्य, तसेच त्यांच्याद्वारे रचित काही श्लोक आणि अगस्त्य मुनींचे 'लक्ष्मी स्तोत्रम्' या माध्यमातून जाणून घेण्यास मदत होते. पौराणिक कथांनुसार, महर्षी अगस्त्य आणि त्यांची पत्नी लोपामुद्रा यांच्याशी निगडित असलेले दीपावलीचे अर्थात प्रकाशोत्सवाचे कथानक गृहस्थधर्माचे महत्त्व आणि पती-पत्नीमधील परस्पर आदराचे एक सुंदर प्रतीक मानले जाते.

लोपामुद्रेची ऐश्वर्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी अगस्त्य ऋषींनी आपल्या तपोबलाच्या जोरावर आणि इल्वल व वातापी यांचा पराभव करून विपुल धन-ऐश्वर्य मिळवले. त्यांनी मिळवलेले सर्व ऐश्वर्य पत्नी लोपामुद्रेला समर्पित केले.

दिवाळीचा आणि दिव्यांचा संबंध पुरातन आहे. असे मानले जाते की, जेव्हा महर्षी अगस्त्य विपुल धन, सुवर्ण तसेच रत्ने घेऊन आश्रमात परतले, त्यावेळी लोपामुद्रेच्या इच्छेनुसार तत्कालीन अवघा परिसर राजवाड्यासारखा सुशोभित करण्यात आला.

अगस्त्य ऋषींनी आणलेल्या ऐश्वर्याचे स्वागत करण्यासाठी आणि अभाव, कमतरता व उणीवा दूर सारून समृद्धीचा उत्सव साजरा करण्यासाठी लोपामुद्रेने संपूर्ण आश्रम शेकडो दिव्यांनी उजळवून टाकला होता.

गृहस्थधर्माचा हा विजय मानला गेला. अंधारावर प्रकाशाचा, त्याचप्रमाणे संन्यस्त वृत्तीवर पवित्र गृहस्थधर्माचा हा विजय होता. अशा आनंदाच्या निमित्ताने साजरा केलेला हा दीपोत्सव 'दिवाळी'चे प्रतीक मानला गेला. येथे पती-पत्नीच्या संकल्पामुळे घरात लक्ष्मी (समृद्धी) आणि प्रकाशाचे आगमन झाले. एक प्रकारे हा आध्यात्मिक संदेश होता. या कथानकाचा दीपावलीशी जोडला गेलेला मुख्य संदेश असा आहे की, तप आणि धर्म जेवढे महत्त्वाचे आहेत, तितकेच संसारातील परस्पर प्रेम, समर्पण आणि आदरही श्रेष्ठ दर्जाचे आहेत. घरात सुख-समृद्धी आणि आनंदाचा प्रकाश अर्थात दिवाळी तेव्हाच येते, जेव्हा पती-पत्नी एकमेकांच्या भावनांचा मान राखून, आदर करून सुसंवाद साधतात.

महर्षी अगस्त्य यांची दीपावलीविषयक भूमिका, तसेच त्यांचा पारंपरिक दृष्टिकोन प्रामुख्याने अंधकारावर प्रकाशाची मात, ज्ञानसाधना आणि महालक्ष्मीची कृपा या आध्यात्मिक तत्त्वांवर आधारित आहे. परंपरागत आध्यात्मिक विचारधारेनुसार, अगस्त्य ऋषींनी रचलेले 'अगस्त्यरचित लक्ष्मी स्तोत्रम्' दीपावलीच्या कालावधीत लक्ष्मीपूजनासाठी फलदायी मानले गेले आहे.

दीपावलीचे आध्यात्मिक महत्त्व आणि अगस्त्य ऋषींच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या काही महत्त्वपूर्ण

संस्कृत ओळी (श्लोक) आणि त्यांचा अर्थ पुढीलप्रमाणे मांडता येईल.

अगस्त्य ऋषीरचित लक्ष्मी स्तोत्रम् (दीपावली पूजन श्लोक)

हे स्तोत्र दीपावलीच्या पर्वात सुख-समृद्धी तसेच लक्ष्मीच्या कृपेसाठी संदर्भीय मानले जाते.

महर्षी अगस्त्य यांनी रचलेल्या स्तोत्रातील पुढील श्लोकाचा उल्लेख आढळतो.

जयन्ती मङ्गला काली भद्रकाली कपालिनी।

दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तु ते।।

आशय : संपूर्ण विश्वाचे कल्याण करणारी, मंगलमयी, सर्व संकटांचा नाश करणारी आणि परमकल्याणाचे रूप असलेल्या हे देवी महालक्ष्मी, तुला माझा नमस्कार असो .

अंधकाराचा विनाश आणि प्रकाशाचा दृष्टिकोन येथे प्राधान्याने समोर येतो. अगस्त्य ऋषी हे तपाचे आणि आंतरिक ऊर्जेचे प्रतीक आहेत. त्यांनी विंध्याचल पर्वताचा अहंकार घालवून सृष्टीत प्रकाशपर्वाची निर्मिती केली, असा संदर्भ मिळतो. दीपावलीच्या दीपप्रज्वलनाशी संबंधित असा हा श्लोक त्यांचा विशेष दृष्टिकोन प्रदर्शित करतो.

दीपो न केवलं गृहं हृदयं अपि प्रकाशयति।

प्रेमैव महान् प्रकाशः शुभा दीपावली।।

आशय : दिवा केवळ घरालाच नाही, तर माणसाच्या हृदयालाही प्रकाशित करतो. विश्वातील सर्वांत मोठा प्रकाश हा प्रेमाचाच प्रकाश आहे. अशी ही दीपावली मंगलमयी आणि कल्याणकारी असो.

सत्कर्माचे महत्त्व (दीपावलीचा आध्यात्मिक भाव) ऋषिपरंपरेनुसार, दीपावली हा केवळ बाह्य दिव्यांचा उत्सव नसून सत्कर्माचा प्रकाश पसरवण्याचा सण आहे.

दीपस्य ज्वाला लघ्वी तथापि तमः हरति।

सत्कर्म अल्पमपि महद् फलम् आवहति।।

आशय : दिव्याची ज्योत आकाराने लहान असली, तरी ती घनघोर अंधकाराचाही नाश करते. त्याचप्रमाणे, मनुष्याने केलेले छोटेसे सत्कर्म अर्थात चांगले कामदेखील आयुष्यात खूप मोठे आणि महान फळ देऊन जाते.

हा समृद्धी आणि आशेचा संदेश आहे. दीपावलीच्या रात्री जिथे सकारात्मकता असते, तिथे लक्ष्मीचा वास असतो, हा अगस्त्य ऋषींच्या तत्त्वज्ञानाचा गाभा समजला जातो.

यत्र दीपः प्रज्वलति तत्र आशा वर्धते।

यत्र प्रेम वसति तत्र लक्ष्मीः निवसति।।

आशय : जिथे दिवा प्रज्वलित असतो, तिथे आशेचा किरण अधिक तेजस्वी होतो आणि ज्या ठिकाणी मनात प्रेम व आस्था असते, तिथेच खऱ्या अर्थाने महालक्ष्मीचा निवास असतो.

थोडक्यात, अगस्त्य ऋषींचा दीपावलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बाह्य अज्ञानाचा अंधकार दूर करून आंतरिक ज्ञानाचा (प्रकाशाचा दिवा) दीप प्रज्वलित करणे आणि सात्त्विक मार्गाने लक्ष्मीची (समृद्धीची) आराधना करणे, हाच आहे.

दीपोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महर्षी अगस्त्य मुनी आणि लोपामुद्रा मातेच्या संकल्पनेतील दीपावली, तसेच एकूणच प्रकाशपर्वाविषयीची त्यांची भूमिका दुर्मिळ श्लोकांच्या आधारे समजून घेण्याचा हा प्रयत्न पुरेसा ठरेल, ही विनम्र अपेक्षा.



- डॉ. सुनील शिंदे,

' दत्त सुकृत' , व्हेलेन्सिया सोसायटी,
ए - १ इमारत, बी विंग, फ्लॅट नं. १०४,
पहिला मजला, अगस्ती साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
मो. ९० ७५ ९९ ४३ ३२

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



दिवाळी सण आनंदाचा

दिवाळी सणात बाह्यदीपाने जसे अंगण प्रकाशाने उजून निघते, तसेच अंतरी असलेला अज्ञानाचा अंधार, तिमिर जाऊन मनात ज्ञानाचा प्रकाश पडू दे. सर्वांना सुखाचा आनंद मिळू दे, अशी प्रार्थना ईश्वर चरणी करण्यात येते. अश्विन शुद्ध त्रयोदशीला, धनत्रयोदशीला धनाची घराघरात पूजा होते. सुख-समृद्धीसाठी मानवी जीवनातील गरजांच्या पूर्ततेसाठी धनाची आवश्यकता असते. श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणे उत्तम व्यवहारे धनाची प्राप्ती करावी व ते योग्य मार्गे खर्च व्हावे.

- बी. के. गायकवाड

अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवसांचा देवी आदिशक्ती मातेचा 'शारदिय नवरात्र' महोत्सव पार झाला की, दहाव्या दिवशी म्हणजेच अश्विन शु. दशमीला विजयादशमी दसरा सण येतो. याच दिवशी श्री रामचंद्रांनी दुष्ट रावणाचा युद्धात संहार केला व राक्षसांचे निर्दालन करून विजय मिळविला, धर्मरक्षण केले. महाभारत पर्वात 'पाच पांडवांनी तेरा वर्षे वनवास सोसून झाल्यावर आपली शस्त्रे शमीवृक्षाच्या डोलीतून बाहेर काढली व सज्ज केली. दसऱ्याला सीमोल्लंघन करून देवदर्शन करून येताना सुवर्णपत्राचे प्रतीक म्हणून या दिवशी आपटा वृक्षाची पाने देवाच्या चरणी वाहून एकमेकांना प्रेमाने दिली जातात. दसरा हा साडेतीन मुहुर्तांपैकी एक मुहूर्त. कारखान्यातून यंत्रांची व यांत्रिक उपकरणांची पूजा करण्यात येते. या दसरा सणाचा उत्सव सर्वत्र अत्यंत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

धरती पावसाळ्यात पाण्याने तृप्त झालेली असते. सर्वत्र वृक्षवल्ली बहरून आलेली हिरवाई नटलेली दिसते. शेतातील खरीपाची काढणी नुकतीच उरकलेली. रब्बीचा पीक हंगाम सुरू होतो. साळ-भात पिके शेतात डोलत असतात, तर पठारावर ज्वारी कणसाने भरून येते. पावसाळ्यानंतर नभातील वातावरण निवळल्याने चंद्रांचे चांदणे नभी दाटून येते. त्यात कोजागिरीच्या पूर्ण चंद्राचे सर्वांना मनोहारी दर्शन होते. दुग्ध प्राशनाचा आनंद घेतला जातो.

पौर्णिमेनंतर थंडीची हलकीशी चाहूल लागते. शरद ऋतुचे आगमन झालेले असते. सर्वांचा आवडता दीपावलीचा सण समिप येतो. शेतकरी, व्यापारी, उद्योग, व्यावसायिक सर्व स्तरातील लोक या सर्वांनाच येणाऱ्या दिवाळी सणाची आंतरिक ओढ लागलेली असते. राज्यात चालू वर्षी पर्जन्यवृष्टी कमी झाल्याने शेतीच्या संदर्भात दुष्काळाचे सावट असल्याने शेतकरी बांधव चिंतेत आहेत. ही नैसर्गिक आपदा लवकर दूर व्हावी, ही ईश्वरचरणी प्रार्थना. येणाऱ्या सणाच्या आनंदात सहभागासाठी त्यांना मदतीचा हातभार लावला पाहिजे.

घराघरात सर्वजण सजावट, रंगरंगोटी, नवीन खरेदी, नूतन वस्त्रांची खरेदी, दिवाळीचा विशेष फराळासाठी लागणाऱ्या पदार्थांची जमवाजमव यात वेळ कसा निघून जातो. अश्विनी वैद्य द्वादशीला 'वसुबारस' आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेतकरी गोपालन करतात. संवत्सधेनुचे सर्वजण

अत्यंत प्रेमाने पूजन करतात. गोमातेला गोडाचा घास भरवितात. आजच्या दिनापासून दिवाळी उत्सव प्रारंभ झालेला असतो.

घरात गृहिणी विविध फराळाचे जिन्नस बनविण्यात दंग होतात. थंडीच्या ऋतूत शरीराच्या आरोग्य रक्षणासाठी स्निग्ध पदार्थ आवश्यक असतात. विशेष म्हणजे हा दिवाळी फराळ आप्त एकमेकांत वाटून या सणाचा आपुलकीचा आनंद घेतात.

अंगणात सडामार्जन करून त्यावर सुंदर रांगोळ्या काढण्यात येतात. घरासमोर उंचावर आकाशदीप लावण्यात येतात. हा सणच दीपांचा, मंगलमय प्रकाशाचा. असंख्य दीप ठायी ठायी लावून आसमंत प्रकाशमय होतो. हिंदू परंपरेला दिवाळी सणाचे सांस्कृतिक महत्त्व आहे.

सणांत बाह्यदीपाने जसे अंगण प्रकाशाने उजून निघते, तसेच अंतरी असलेला अज्ञानाचा अंधार, तिमिर जाऊन मनात ज्ञानाचा प्रकाश पडू दे. सर्वांना सुखाचा आनंद मिळू दे, अशी प्रार्थना ईश्वर चरणी करण्यात येते. अश्विन शुद्ध त्रयोदशीला, धनत्रयोदशीला धनाची घराघरात पूजा होते. सुख-समृद्धीसाठी मानवी जीवनातील गरजांच्या पूर्ततेसाठी धनाची आवश्यकता असते. श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणे उत्तम व्यवहारे धनाची प्राप्ती करावी व ते योग्य मार्गे खर्च व्हावे.

धनपूजेसोबत त्याच त्रयोदशीस श्री विष्णू अवतार धन्वंतरींची मनोभावे पूजा करण्यात येते व सर्वांचे जीवन सुखमय व आरोग्यमय असावे यासाठी प्रार्थना करण्यात येते. यम दीपदान करण्यात येते. दिवाळीचा नरक चर्तुदशीचा दिवस. अश्विन वैद्य १४. नरकासूर राक्षसाचा वध करून या दिवशी भगवंत श्रीकृष्णाने त्याच्या बंदिवासातील १६ सहस्त्र कन्यकांना मुक्त केले. या दिवशी पहाटे लवकर उठून अभ्यंगस्नान करण्यात येते. सुवासिक उटणे व सुगंधीत तेल लावून स्नान केले जाते. त्यानंतर येतो अश्विनी अमावास्येचा दिवस 'श्री लक्ष्मी पूजन' दिवाळीचा सर्वात महत्त्वाचा दिवस. पहाटे प्रातःकाळी ब्रह्ममुर्हुर्तावर उठून अभ्यंगस्नान होते. देवता, गुरुजनांचे ध्यान, ईश्वराचे नामस्मरण करण्यात येते. देवाच्या पूजेनंतर बनविलेल्या फराळाचा आस्वाद घेण्यात येतो. दिवाळी सण हा आनंदाचा आहे. त्याच्या प्रत्येक दिनाचे महत्त्व आहे. दिवाळी अमावास्येला सायंकाळी घरोघरी अंगणात दिवे लावण्यात येतात. मोठ्या उत्साहात श्री विष्णूनारायण-लक्ष्मी यांचे स्मरण करुन पूजा होते. अबालवृद्ध लक्ष्मीपूजनात सहभाग घेतात.

दिवाळी सणाचा आंनद द्विगुणीत करणारा हा श्री लक्ष्मीपूजनाचा सोहळा असतो. घराघरात सुख, समृद्धी, समाधान व आनंद राहावे, यासाठी मनोभावे लक्ष्मीमातेस वंदन करून आरती म्हणून प्रार्थना करण्यात येते. पूजेत मांगल्याचे प्रतीक म्हणून घटाघटातून साळीचे लाह्या-बत्तासे धने, आवळा फळ व ऊस ठेवण्यात येतो. दिव्यांची आरास करण्यात येते. दीपावलीच्या या शुभपर्वात मनुष्य आपले नित्याचे दैनंदिन जीवनातील सुख-दुःख बाजूला ठेवून या सणाच्या आनंद-उत्सवात प्रसन्न मनाने सहभाग घेतो.

आध्यात्मिक दृष्ट्या दिवाळी सणाचे महत्त्व आहे. संत सांगतात, जीवनात आनंदी राहण्यासाठी नेहमी सत्कर्मे करीत परोपकारी वृत्ती ठेवा. सात्विकतेने आपले कर्माचरण करा. अंतःकरणात ईश्वरभक्ती ठेवा. सर्वांभूती ईश्वराला पाहा. संत सहवासात सत्संगात संतांच्या चरणी लीन होऊन

सणाचा आनंद घ्या. यास्तव म्हटले जाते, 'साधू-संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा'. संत महात्मे सत्संगातून अनेक मुमुक्षु भक्तांना त्यांच्यातील अज्ञान दूर करून ज्ञानाचा प्रकाश देतात व जीवाचा उद्धार करतात. त्यासाठी जीवनात जीवाला सद्गुरू भेटणे नितांत आवश्यक आहे. सर्वभावे श्रद्धायुक्त अंतःकरणाने श्री गुरुचरणी शरण जावे. श्रीगुरुंची सेवा करावी.

दिवाळी सण हा पूर्वापार साजरा होत आहे. श्री दत्तात्रेय गुरूंच्या गाणगपूराग्रामी भीमा-अमरजा नदी संगमी आश्रमी असता त्यांच्या नजीकच्या सात भक्तांनी दिवाळी फराळास आमंत्रित केले. त्यासमयी श्री गुरुंनी एकाच वेळी अष्टरूप होऊन सातही शिष्यांकडे जावून व आश्रमीही राहून दिवाळी सण साजरा केला याचा उल्लेख श्री गुरुचरित्र कथेतून येतो.

दीपावली पाडवा कार्तिक मास प्रतिपदा हा साडेतीन मुहुर्तांपैकी एक आहे. श्री गणेशासह सरस्वतीची पूजा करून त्या दिवशी व्यापारी वर्ग आपल्या वह्यांचे पूजन करून व्यापार वृद्धीसाठी प्रार्थना करतात. पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नवीन उद्योगाचा आरंभ करतात. पाडवा बलिप्रतिपदेला बळी या राक्षस राजाचे औदार्य व त्यागाच्या पौराणिक कथेचा संदर्भ आहे. श्रीविष्णूंनी श्रीवामन अवतार धारण करून बळी राजा देवापेक्षा श्रेष्ठ होऊ नये यासाठी त्यास पाताळलोकी जाणे भाग पाडले व त्याच्या प्रजाभक्तीस्तव त्याला या बलिप्रतिपदेस भूलोकी येण्याची अनुमती दिली.

कार्तिक मासातील शुद्ध द्वितीयेस 'भाऊबीज' सर्वत्र साजरी होते. घराघरांतून बहीण आपल्या भावास औक्षण करते. बहीण-भावाचे हे नाते अखंड प्रेमाचे बंधन असते. भाऊ आपल्या लाडक्या बहिणीस ओवाळणी म्हणून तिला आवडीची वस्तू भेट देतो. दिवाळी फराळाचा आनंद घेण्यात येतो. दिवाळी सणास अनेक भक्त बंधू-भगिनी कोकमठाण येथे आत्मा मालिक ध्यानपीठात येतात. प. पू. सद्गुरुंचरणी विनम्र होऊन मनोभावे दर्शन घेतात. या पवित्र दिवाळी सणास आश्रमातील चैतन्यमय वातावरणात सर्व संतांच्या सान्निध्यात व प. पू. सद्गुरूंच्या पावन उपस्थितीत सत्संगातून, ध्यान धारणेतून आत्मचिंतन करतात.

ध्यानमूलम् गुरुर्मूती। पूजामूलम् गुरूपदंम।
मंत्रमूलम् गुरुर्वाक्य। मोक्षमूलम् गुरुकृपा।।

श्रीगुरूआज्ञेने सातत्याने केलेल्या आत्मचिंतनातून आत्मज्ञानाची प्राप्ती होते व भक्ताला जीवनातील शाश्वत आनंद, आत्मानंद मिळतो. दविाळी सणानिमित्त आत्मा मालिक परिवारातील सर्वांना हार्दिक शुभेच्छा. ही दिवाळी सर्वांना आनंदाची व सुखाची जावो हीच सद्गुरुचरणी विनम्र प्रार्थना.

।।आत्मा मालिक।।



- बी.के. गायकवाड

प्लॉट नं. ५, नव महाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी, पुणे-सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९, मो. नं. ९४०३०२६१६४

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



दीपावली : आध्यात्मिक संकल्प का पर्व

स्वयं प्रकाशित होना दीपावली का सबसे महत्वपूर्ण प्रतीक दीपक है। एक छोटा-सा दीपक अपने सीमित अस्तित्व के बावजूद अंधकार को चुनौती देने की क्षमता रखता है। वह अंधकार के विस्तार की चिंता नहीं करता, बल्कि अपने स्वभाव के अनुरूप प्रकाश देता है। यही दीपक मनुष्य के जीवन का भी एक गहरा आध्यात्मिक रूपक है। मनुष्य के भीतर भी एक दिव्य ज्योति विद्यमान है, जिसे भारतीय दर्शन आत्मा अथवा आत्मचेतना कहता है।

-नरेश यादव

ब्रह्मांडीय ऊर्जा, आत्मचेतना और संकल्प-सिद्धि के पावन अवसर- दीपावली का नाम आते ही मन में असंख्य दीपों की ज्योति, सजे हुए घर-आँगन, लक्ष्मी-गणेश पूजन और उत्सव का उल्लास उभरने लगता है, साथ ही प्रकृति के परिवर्तन, ऋतुओं की लय, सूर्य-चंद्रमा की गति और सृष्टि के विभिन्न चक्रों का ध्यान रखते हुए, हमारे ऋषि-मुनियों ने इस विशेष पर्वकाल को साधना, उपासना, आत्मचिंतन और संकल्प के लिए महत्वपूर्ण माना है। दीपावली भी ऐसा ही एक विशिष्ट पर्वकाल है। यह वह समय है जब प्रकृति के परिवर्तन और सामूहिक आध्यात्मिक चेतना के बीच मनुष्य स्वयं को एक नई दिशा देने का अवसर प्रदान करता है। ब्रह्मांडीय ऊर्जा से तात्पर्य उस व्यापक सार्वभौमिक चेतना और परम सत्ता की दिव्य व्यवस्था से है, जिसका मनुष्य स्वयं भी एक अंश है। जब मनुष्य का मन, विचार, भावना और कर्म एक ही पवित्र उद्देश्य की दिशा में संयोजित होते हैं, तब उसकी संकल्प-शक्ति प्रभावशाली बनती है।

ब्रह्मांडीय ऊर्जा और दीपावली का आध्यात्मिक संबंध बहुत गहरा है, यह संपूर्ण सृष्टि एक विराट ऊर्जा-व्यवस्था का हिस्सा है। सूर्य का प्रकाश, चंद्रमा की शीतलता, पृथ्वी की जीवनदायिनी शक्ति और प्रकृति का संतुलन उस व्यापक व्यवस्था के विभिन्न स्वरूप हैं, जिसके बीच मानव जीवन विकसित होता है।भारतीय अध्यात्म इस व्यवस्था के पीछे एक परम चेतना, परम सत्ता अथवा दिव्य तत्त्व की उपस्थिति स्वीकार करता है। मनुष्य की अधिकांश ऊर्जा सामान्यतः इच्छाओं, चिंताओं, भविष्य की आशंकाओं और अतीत की स्मृतियों में बिखरी रहती है। उसके भीतर अपार सामर्थ्य होते हुए भी वह अपनी पूरी क्षमता का उपयोग नहीं कर पाता। लेकिन जब वह अपने विचारों को एक दिशा देता है, मन को स्थिर करता है और जीवन के उद्देश्य को स्पष्ट करता है, तब उसकी बिखरी हुई मानसिक एवं भावनात्मक शक्ति एक केंद्र पर एकत्र होने लगती है। दीपावली का पर्व इस आंतरिक संयोजन का विशेष अवसर बन सकता है। दीप प्रज्वलन, मंत्रोच्चार, ध्यान, प्रार्थना और सामूहिक उपासना के माध्यम से मनुष्य अपने अंतर्मन को पवित्र एवं एकाग्र करने का प्रयास कर सकता है।

परम सत्ता की चेतना तो प्रत्येक क्षण विद्यमान है, किंतु पर्वों की विशेषता यह है कि वे सामूहिक आस्था और आध्यात्मिक वातावरण के माध्यम से मनुष्य को अपनी चेतना के प्रति अधिक सजग बनाते हैं।इसलिए दीपावली का वास्तविक लाभ तभी है, जब बाहरी प्रकाश के साथ हम अपने भीतर भी एक आध्यात्मिक प्रकाश का अनुभव करने का प्रयास करें।

दीप का आध्यात्मिक रहस्य :

स्वयं प्रकाशित होना दीपावली का सबसे महत्वपूर्ण प्रतीक दीपक है। एक छोटा-सा दीपक अपने सीमित अस्तित्व के बावजूद अंधकार को चुनौती देने की क्षमता रखता है। वह अंधकार के विस्तार की चिंता

नहीं करता, बल्कि अपने स्वभाव के अनुरूप प्रकाश देता है। यही दीपक मनुष्य के जीवन का भी एक गहरा आध्यात्मिक रूपक है। मनुष्य के भीतर भी एक दिव्य ज्योति विद्यमान है, जिसे भारतीय दर्शन आत्मा अथवा आत्मचेतना कहता है। किंतु इच्छाएँ, मोह, अहंकार, ईर्ष्या और भय उस ज्योति को हमारी अनुभूति से ओझल कर देते हैं।

जब हम दीप प्रज्वलित करें, तो स्वयं से भी पूछें-क्या हमारा अंतर्मन उतना ही प्रकाशित है जितना हमारा घर? क्या हमारे विचार निर्मल हैं? क्या हमारे व्यवहार में करुणा है? क्या हमारे निर्णयों में न्याय और कर्मों में ईमानदारी है?

बाहरी दीपक को तेल, बाती और अग्नि की आवश्यकता होती है, उसी प्रकार अंतःदीप को श्रद्धा, विवेक और साधना की। दीपक की लौ सदैव ऊपर की ओर उठती है। यह हमें भी अपनी चेतना को ऊर्ध्वगामी बनाने, वृत्तियों को परिष्कृत करने और जीवन को किसी उच्चतर उद्देश्य से जोड़ने की प्रेरणा देती है। दीपावली का वास्तविक संदेश यही है कि हम केवल स्वयं प्रकाशित न हों, बल्कि अपने विचारों, व्यवहार और कर्मों से दूसरों के जीवन में भी प्रकाश फैलाएँ।

यह संकल्प का पर्व है, किंतु यहाँ संकल्प और इच्छा का अंतर भी समझना आवश्यक है, क्योंकि, संकल्प-सिद्धि का आधार है, और मनुष्य का जीवन इच्छाओं से भरा हुआ है। प्रत्येक व्यक्ति कुछ पाना, बनना अथवा बदलना चाहता है। परंतु, इच्छा और संकल्प में मौलिक अंतर है।इच्छा मन की आकांक्षा है, जबकि संकल्प चेतना का दृढ़ निर्णय है। इच्छा कहती है-मैं सफल होना चाहता हूँ। संकल्प कहता है-मैं सफलता के योग्य बनने के लिए आवश्यक परिवर्तन करूँगा, अनुशासन अपनाऊँगा और कठिनाइयों के बावजूद आगे बढ़ता रहूँगा।इच्छा कहती है-मैं आध्यात्मिक उन्नति चाहता हूँ। संकल्प कहता है-मैं अपने मन को निर्मल करूँगा, सद्गुरु के निर्देशों को जीवन में उतारूँगा और साधना को अपने जीवन का अभिन्न अंग बनाऊँगा। यही वह बिंदु है जहाँ दीपावली का आध्यात्मिक महत्व अपने वास्तविक स्वरूप में प्रकट होता है।

इस पर्व पर लक्ष्मी-गणेश पूजन और प्रार्थना के साथ यदि मनुष्य अपने जीवन के लिए कुछ स्पष्ट, पवित्र और सार्थक संकल्प निर्धारित करे, तो यह उत्सव आत्मविकास की दिशा में एक महत्वपूर्ण पड़ाव बन सकता है। संकल्प केवल मन में विचार दोहराने से सिद्ध नहीं होता। उसे विचार से भावना, भावना से निर्णय और निर्णय से कर्म तक ले जाना पड़ता है। उसकी वास्तविक शक्ति निरंतरता में निहित है। संकल्प वह बीज है, जो चेतना की भूमि में बोया जाता है; श्रद्धा उसका पोषण करती है, साधना उसे शक्ति देती है और सतत कर्म उसे फलित करता है। इसलिए दीपावली पर संकल्प लेना केवल एक परंपरा नहीं, बल्कि अपने जीवन के प्रति एक गंभीर आध्यात्मिक उत्तरदायित्व स्वीकार करना है।

दीपावली के पाँच पर्व :

आत्मशुद्धि से आत्मविकास की यात्रा है धनतेरस से भाई दूज तक विस्तृत दीपावली की पर्व-श्रृंखला अपने भीतर एक सुंदर आध्यात्मिक दर्शन समेटे हुए है। यदि हम इन पर्वों को आत्मविकास की क्रमिक अवस्थाओं के रूप में देखें, तो प्रत्येक पर्व एक विशेष संदेश देता है।

धनतेरस :

वास्तविक संपदा की पहचान धनतेरस पर धन और आरोग्य के देवता धन्वंतरि की आराधना की जाती है। यह पर्व हमें स्मरण कराता है कि वास्तविक धन केवल मुद्रा और संपत्ति नहीं, बल्कि स्वास्थ्य, सद्बुद्धि, विवेक, ज्ञान, संतोष और आत्मिक शांति भी है। धन अर्जित करने के साथ यदि मनुष्य सद्भाव, विनम्रता और मधुर संबंध अर्जित नहीं कर पाया, तो उसकी समृद्धि अधूरी है। इस दिन का संकल्प होना चाहिए कि हम अपने जीवन को केवल भौतिक रूप से नहीं, बल्कि विचारों, संस्कारों और चेतना के स्तर

पर भी समृद्ध बनाएँगे।

नरक चतुर्दशी :

अंतर्मन के अंधकार से मुक्ति, भगवान श्रीकृष्ण द्वारा नरकासुर के वध की पौराणिक कथा का एक आंतरिक अर्थ भी है। नरकासुर को मनुष्य के भीतर पनपने वाली नकारात्मक वृत्तियों का प्रतीक माना जा सकता है। क्रोध, लोभ, मोह, ईर्ष्या, द्वेष, अहंकार और प्रतिशोध ऐसी वृत्तियाँ हैं, जो मनुष्य को उसके वास्तविक स्वरूप से दूर करती हैं। इस दिन हमें दूसरों के दोष देखने के बजाय अपने भीतर झाँकने का प्रयास करना चाहिए। किसी के प्रति संचित कटुता अथवा अपने भीतर छिपे अहंकार को पहचानकर उससे मुक्त होने का संकल्प लेना चाहिए। सच्ची नरक चतुर्दशी वही है, जब मनुष्य अपने भीतर के नरक को समाप्त करने की प्रक्रिया आरंभ करे।

दीपावली की अमावस्या :

आत्मप्रकाश का जागरण, अमावस्या की अंधकारमय रात्रि में असंख्य दीपों का प्रज्वलित होना अपने आप में एक गहरा आध्यात्मिक प्रतीक है। यह संदेश देता है कि अंधकार कितना भी विस्तृत क्यों न हो, प्रकाश की एक छोटी-सी ज्योति भी उसे चुनौती दे सकती है। जीवन में भी अनेक बार ऐसी परिस्थितियाँ आती हैं, जब भविष्य अस्पष्ट दिखाई देता है। ऐसे समय में बाहरी परिस्थितियों से प्रकाश की अपेक्षा करने के बजाय मनुष्य को अपनी अंतःचेतना में श्रद्धा और विश्वास की ज्योति प्रज्वलित करनी चाहिए। इस दिन लक्ष्मी-गणेश पूजन का भी विशेष महत्व है। लक्ष्मी समृद्धि, सौभाग्य और शुभता का प्रतीक हैं, जबकि गणेश बुद्धि, विवेक और विघ्न-विनाश के। इनका संयुक्त पूजन हमें समझाता है कि समृद्धि के साथ सद्बुद्धि और उपलब्धि के साथ विवेक भी आवश्यक है। धन यदि विवेक से रहित हो, तो अहंकार और विनाश का कारण बन सकता है।अतः इस रात्रि का संकल्प केवल कुछ प्राप्त करने का नहीं, बल्कि स्वयं को उस प्राप्ति के योग्य बनाने का होना चाहिए।

गोवर्धन पूजा :

कृतज्ञता और प्रकृति के प्रति उत्तरदायित्व, भगवान श्रीकृष्ण द्वारा गोवर्धन पर्वत धारण करने की कथा प्रकृति-संरक्षण, सामूहिक सहयोग और अहंकार के परित्याग का संदेश देती है। पृथ्वी, जल, वनस्पति और जीव-जगत मानव जीवन के आधार हैं। मनुष्य अपनी उपलब्धियों पर गर्व करता है, किंतु यह भूल जाता है कि उसके अस्तित्व में प्रकृति, परिवार और समाज का भी महत्वपूर्ण योगदान है। गोवर्धन पूजा हमें कृतज्ञता, सहयोग और प्रकृति के प्रति संवेदनशीलता का संकल्प लेने की प्रेरणा देती है। आध्यात्मिकता केवल पूजा और ध्यान तक सीमित नहीं, बल्कि प्रकृति एवं समस्त जीवों के प्रति उत्तरदायित्व निभाना भी है।

भाई दूज :

प्रेम और आत्मीयता का विस्तार, भाई दूज भाई-बहन के प्रेम, विश्वास और पारिवारिक आत्मीयता का प्रतीक है। आध्यात्मिक दृष्टि से यह पर्व हमें अपने प्रेम और सद्भाव का विस्तार करने की प्रेरणा देता है। परिवार के संबंध हमें प्रेम, त्याग, क्षमा और उत्तरदायित्व का अभ्यास कराते हैं। यही गुण आगे चलकर व्यापक मानवीय संबंधों में भी प्रकट होने चाहिए। इस प्रकार दीपावली की पर्व-श्रृंखला मनुष्य को एक क्रमिक आध्यात्मिक यात्रा पर ले जाती है-वास्तविक संपदा की पहचान, विकारों से मुक्ति, आत्मप्रकाश का जागरण, कृतज्ञता और प्रकृति-संरक्षण तथा प्रेम का विस्तार।

राम का अयोध्या आगमन : भीतर के राम का जागरण

दीपावली से जुड़ी भगवान श्रीराम के चौदह वर्ष के वनवास के पश्चात अयोध्या लौटने की मान्यता

अत्यंत लोकप्रिय है। अयोध्यावासियों ने अपने प्रिय राजा के स्वागत में दीप जलाकर संपूर्ण नगर को प्रकाशित कर दिया था।यह प्रसंग केवल एक पौराणिक घटना नहीं, बल्कि धर्म, मर्यादा, सत्य और विवेक की पुनर्स्थापना का प्रतीक भी है। रावण ज्ञान और शक्ति से संपन्न था, किंतु अहंकार और अनियंत्रित इच्छाओं के कारण उसका पतन हुआ। इसके विपरीत श्रीराम का चरित्र त्याग, धैर्य, मर्यादा और आत्मसंयम का आदर्श प्रस्तुत करता है।

इस कथा का आंतरिक संदेश यह है कि मनुष्य के भीतर भी राम और रावण के प्रतीकात्मक स्वरूप विद्यमान हैं। एक ओर विवेक और मर्यादा हैं, तो दूसरी ओर अहंकार, लोभ और स्वार्थ। दीपावली का वास्तविक स्वागत तभी पूर्ण होता है, जब हमारे अंतर्मन में राम-तत्त्व की पुनर्स्थापना हो। हम अपने जीवन में किसका स्वागत कर रहे हैं-अहंकार का या विनम्रता का, प्रतिशोध का या क्षमा का, स्वार्थ का या सेवा का? सच्ची दीपावली तब है, जब हमारे भीतर का राम हमारे ही अंतर्मन की अयोध्या में पुनः प्रतिष्ठित हो।

लक्ष्मी-पूजन :

समृद्धि का आध्यात्मिक स्वरूप दीपावली की रात्रि लक्ष्मी-पूजन का विशेष महत्व है। प्रत्येक व्यक्ति सुख, शांति और समृद्धि चाहता है। किंतु आध्यात्मिक दृष्टिकोण हमें समृद्धि का व्यापक अर्थ समझाता है।धन अर्जित करना एक उपलब्धि हो सकती है, लेकिन उसका उपयोग किस उद्देश्य से किया जाता है, यह मनुष्य की चेतना और संस्कारों को प्रकट करता है। लक्ष्मी का स्थायी स्वागत केवल धन-संग्रह से नहीं, बल्कि परिश्रम, न्याय, ईमानदारी, सदाचार और संतुलित जीवन से होता है। जहाँ धन के प्रति अंधा आकर्षण है, वहाँ असंतोष बढ़ता है; जहाँ समृद्धि के साथ अहंकार जुड़ता है, वहाँ संबंधों की मधुरता समाप्त होने लगती है।इसके विपरीत, जहाँ उपलब्धि के साथ विनम्रता और संपन्नता के साथ परोपकार जुड़ा हो, वहाँ धन भी एक सकारात्मक शक्ति बन जाता है। इसलिए लक्ष्मी-पूजन के अवसर पर हमारा संकल्प होना चाहिए कि हम धन को केवल व्यक्तिगत उपभोग का साधन नहीं, बल्कि अपने और दूसरों के जीवन में सकारात्मक परिवर्तन लाने का माध्यम बनाएँगे।

संकल्प-सिद्धि :

मन, विचार और कर्म की एकरूपता, संकल्प की वास्तविक शक्ति तब प्रकट होती है, जब मनुष्य के विचार, भावनाएँ, निर्णय और कर्म एक ही दिशा में प्रवाहित हों। सामान्यतः मनुष्य कुछ सोचता है, कुछ और चाहता है और परिस्थितियों के प्रभाव में करता कुछ और है। यही आंतरिक असंगति उसकी शक्ति को कमजोर करती है। कोई शांति चाहता है, लेकिन अपना समय चिंता और आलोचना में बिताता है। कोई ईमानदारी चाहता है, लेकिन लाभ के लिए सिद्धांतों से समझौता कर लेता है। कोई आध्यात्मिक उन्नति चाहता है, लेकिन साधना के लिए नियमित समय नहीं निकालता। ऐसी स्थिति में संकल्प केवल मानसिक आकांक्षा बनकर रह जाता है। संकल्प-सिद्धि के लिए पाँच बातें आवश्यक हैं-

उद्देश्य की पवित्रता :

संकल्प अहंकार, ईर्ष्या अथवा स्वार्थ से प्रेरित न होकर आत्मविकास और व्यापक कल्याण के लिए हो।

विचारों की स्पष्टता : हमें पता हो कि हम क्या बदलना चाहते हैं और क्यों।

श्रद्धा एवं आत्मविश्वास : अपने उद्देश्य और प्रयासों पर विश्वास रखें।

निरंतर साधना : संकल्प को प्रतिदिन के व्यवहार और अभ्यास में उतारें।

धैर्य एवं समर्पण : अपने कर्तव्य का पूर्ण निर्वहन करें और परिणाम के प्रति अनावश्यक व्याकुलता से मुक्त रहें।

गीता का कर्मयोग भी इसी सत्य को प्रस्तुत करता है कि मनुष्य का अधिकार कर्म पर है, फल पर

नहीं। लक्ष्य आवश्यक है, किंतु फल की चिंता में उलझकर वर्तमान कर्म की गुणवत्ता को प्रभावित नहीं होने देना चाहिए। यही संकल्प की परिपक्वता है।

सद्गुरु का सान्निध्य : संकल्प को दिशा और चेतना को आधार देता है, आध्यात्मिक यात्रा में संकल्प जितना महत्वपूर्ण है, उतना ही महत्वपूर्ण है उसका सही दिशा में होना। मनुष्य अपने सीमित अनुभव और बुद्धि के आधार पर कई बार यह निर्धारित नहीं कर पाता कि उसके वास्तविक कल्याण में क्या निहित है।यहीं सद्गुरु का महत्व प्रकट होता है।सद्गुरु केवल उपदेश देने वाले नहीं, बल्कि साधक को उसके बाहरी अस्तित्व से आगे बढ़कर उसके वास्तविक स्वरूप की ओर देखने की प्रेरणा देने वाले होते हैं। वे केवल यह नहीं बताते कि क्या प्राप्त करना चाहिए, बल्कि यह भी समझाते हैं कि अपने भीतर क्या विकसित करना आवश्यक है।सद्गुरु का सान्निध्य साधक के लिए ऐसी आध्यात्मिक आधारभूमि बनता है, जहाँ विचारों को दिशा, साधना को अनुशासन और संकल्पों को पवित्रता प्राप्त होती है।सद्गुरु की कृपा को अपनी प्रत्येक सांसारिक इच्छा की पूर्ति का साधन मानना उनके गुरु-तत्त्व की महत्ता को सीमित करना होगा। उनकी कृपा का सर्वोच्च स्वरूप यह है कि साधक की चेतना का विकास हो, विवेक जागृत हो, विकार क्षीण हों और वह अपने जीवन के वास्तविक उद्देश्य को समझ सके।दीपावली पर सद्गुरु के चरणों में अपने संकल्प अर्पित करते हुए हमें उनसे केवल उपलब्धियों की कामना नहीं करनी चाहिए, बल्कि अपने संकल्पों के प्रति ईमानदार रहने, कठिनाइयों में धैर्य बनाए रखने और सफलता में विनम्र बने रहने की शक्ति माँगनी चाहिए।सद्गुरु का आशीर्वाद मार्ग को प्रकाशित करता है, लेकिन उस मार्ग पर निष्ठापूर्वक चलने का उत्तरदायित्व साधक का स्वयं का होता है।जिससे हम हम हमारे विस्तार को, प्रकाश का विस्तार की तरह व्यक्तिगत चेतना से सामूहिक कल्याण तक ले जा सकें

अतः सद्गुरु श्रीचरणों में समर्पित एक आध्यात्मिक प्रार्थना इस अवसर पर बहुत आवश्यक है कि हे सद्गुरुदेव! आपके श्रीचरणों में हमारी यही प्रार्थना है कि हमारा मन सदैव आपके बताए मार्ग पर चलने के लिए तत्पर रहे। आपकी शिक्षाएँ हमारे जीवन का आधार बनें। हमारे संकल्पों में पवित्रता, प्रयासों में निरंतरता और हृदय में समर्पण का भाव बना रहे। हमारी प्रत्येक उपलब्धि में विनम्रता, प्रत्येक कठिनाई में धैर्य और प्रत्येक परिस्थिति में परम सत्ता के प्रति विश्वास बना रहे। आपके श्रीचरणों में अनंत श्रद्धा, अटूट विश्वास और कोटि-कोटि नमन।

जित जित पाऊँ गुरु की सेवा, उत उत रोज़ दिवाली है।
मेरे गुरुवर घर तुम आना, घर पर रोज़ दिवाली है ।।

शुभ दीपावली!

प्रकाश बाहर भी हो, प्रकाश भीतर भी हो; संकल्प जीवन में भी हो और समर्पण सद्गुरु के श्रीचरणों में भी हो। इस दृष्टि से दीपावली हमें एक महत्वपूर्ण संदेश देती है-ब्रह्मांड की दिव्य व्यवस्था के साथ अपनी चेतना का तालमेल स्थापित करो, अपने संकल्पों को पवित्र बनाओ और उन्हें सिद्ध करने के लिए स्वयं को पूर्णतः समर्पित कर दो।

।।आत्मा मालिक।।



- नरेश यादव,
आत्मा मालिक परिवार, इंदौर

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



* प्रेषक *

संपादक, मासिक ॐ गुरुदेव

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)-४२३६०१